# माणूस

१३ डिसेंबर १९६९

चाळीस पैसे




कुठे जाणार ? हा प्रश्न प्रत्येकालाच सतावीत असतो. कुठे गेलो याचे उत्तर सुखदुःख-संमिश्र असते. जायचे कुठे तर विनाशाकडेच, हेही अनेकांना अनुभवाने उमगते. या स्पर्धेच्या उत्तरात पुढच्याची आशा सद्यःस्थितीतली उभारी व निराशा आणि वास्तवातले अनुभव या साऱ्यांचे दर्शन होते.

– दुर्गा भागवत

१३ डिसेंबर १९६९

समग्र साप्ताहिक

# माणूस

समग्र साप्ताहिक

वर्ष नववे : अंक अठ्ठाविसावा

संपादक : **श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी ५७३५९

किंमत ४० पैसे : वार्षिक वर्गणी वीस रुपये : परदेशची वर्गणी चाळीस रुपये


स.न.

दिवाळी अंक वाचला. प्रथमच सांगून टाकतो काही खुसखुशीत, खमंग देण्याच्या प्रयत्नात 'माणस' कमी पडला आहे. 'बिर्ला अफेअर्स' हा लेख बरेच काही सांगून जातो. यावर एखादी लेखमाला हवी. 'मी पाहिलेले गंधर्व' या प्रकारच्या लेखमाला इथेच थांबायला हव्यात, नाहीतर गंधर्वांबद्दलचे प्रेम कमी होईल. चित्रकार वसंत सरवटे यांनी सादर केलेली तिकीटमाला प्रशंसनीय व कल्पक (एवढेच सर्वात टॉप) चांदेकरांचे आत्मनिवेदन फारच चांगलं.

— शशिकांत रसाळ, अहमदनगर

'माणूस पॉप्युलर' स्पर्धेचा निकाल दिवाळी अंकात प्रसिद्ध झाला होता. या स्पर्धेच्या यशापयशाचे विवेचन करणारा दुर्गा भागवत यांचा समालोचनात्मक असा लेख या अंकात प्रसिद्ध होत आहे. स्पर्धेतील पहिल्या दोन क्रमांकांची निवेदनेही याच अंकात प्रसिद्ध होत आहेत. इतर विजयी स्पर्धकांची निवेदने माणूसमधून क्रमशः प्रसिद्ध होतील. — संपादक

**प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.**



# दिल्ली

## दिनांक २ डिसेंबर

### काँग्रेस दुहीच्या इतिहासाची पुनरावृत्ती

एक अमीबा दुभंगून त्याचे दोन होतात हा जीवशास्त्राचा नियम गेल्या वार्तापत्रात काँग्रेसला लावला त्यात थोडी दुरुस्ती केली पाहिजे. जीवशास्त्रातला अमीबा पूर्ण वाढ झाल्यानंतरच दुभंगतो, पण काँग्रेस नावाचा हा अमीबा संपूर्ण वाढ होईपर्यंत थांबायला तयार दिसत नाही. कारण इंदिरा-काँग्रेसला जन्मून जेमतेम आठपंधरा दिवस झाले आहेत इतक्यात या पिटुकल्याला फाटाफुटीचे डोहाळे लागले आहेत. आधीच काँग्रेसमन हा कोठल्याही कळपात असला तरी फाटाफुटीच्या निमित्ताला टेकलेला असतो, अन् इंदिरा-काँग्रेसवाल्यांना हे निमित्त नवीन कार्यकारिणीच्या निमित्ताने मिळाले. नवीन काँग्रेसचे नवीन पण टेंपरवारी अध्यक्ष सुब्रह्मण्यम् यांनी चंद्रजित यादव, नंदिनी सत्पाती व गणेश यांना कार्यकारिणीत घेतले आणि आग धुमसायला सुरुवात झाली. लगोलग चार इंदिरानुयायी एम्. पी. बाईंकडे गेले आणि म्हणाले काँग्रेस अध्यक्षांची ही निवड आपल्याला व इतरही काही मंडळींना मुळीच आवडलेली नाही. ही तीन मंडळी पूर्वी साम्यवादी पक्षात होती, इतकेच नव्हे तर दिल्लीतल्या काही साम्यवादी वकिलातीशी त्यांचे लागेबांधे होते असा त्यांच्यावर आरोप आहे.

एकीकडे हे प्रकरण शिजायला लागते तर दुसरीकडे चंद्रशेखर व मोहन धारिया या दुक्कलीपैकी एकालाही कार्यकारिणीत जागा नाही, हे तरुण तुर्कांच्या नजरेतून सुटलेले नाही. चंद्रशेखरांना म्हणे तुमची नीट सोय लावू असे आश्वासन देण्यात आले होते, तरीही त्यांना कार्यकारिणीचे सदस्य करण्याऐवजी 'खास आमंत्रित' करून त्यांची एक प्रकारे सोय नव्हे तर वासलात लावली गेली. धारिया म्हणे म्हणाले, "दोस्त चंद्रशेखरला कार्यकारिणीत जागा नाही ना ? मग मलाही नको!"

अन् या दोन चुकांच्या वर ताण करणारा खिळा म्हणजे बडोद्याचे महाराज फत्तेसिंग गायकवाड यांना कार्यकारिणीत घेण्यात आले! चंद्रशेखरांना गाळण्यात

[ पृष्ठ ६२ वर ]

# माणूसची ' कसे कुठे जाणार ' स्पर्धा

'माणूस'ची स्पर्धा एका दृष्टीने लक्षणीय आहे. आपण आयुष्याचा मार्ग स्वीकारायचा; तो डोळसपणे व शिवाय ठराविक उद्दिष्ट गाठायचे हा या स्पर्धेचा विषय. जीवन जितके जटिल तितकेच जटिल मार्ग व गुंतागुती पटात घ्यायचा प्रयत्न स्पर्धेच्या योजकांनी केला आहे. यातही काही त्रुटी आहेत. त्यामुळे कुठलाही निर्णय सरळसोट घ्यायचा तर स्पर्धकाला भांबावल्यासारखे स्वाभाविकच होते. आणि त्या त्या मार्गाला अनुसरायच्या अटींमुळे कित्येक वेळा तडजोडीचे धोरणही स्वीकारावे लागते, असे या स्पर्धेतल्या लेखांवरून दिसून येते. परंतु ही स्पर्धा अभिनव आहे. कदाचित ही पद्धत रुळली तर अनेक त्रुटी नाहीशाही करता येतील. परंतु या उणिवा कल्पकतेच्या प्रमाणात लहानच आहेत. हल्ली समाजात बौद्धिक स्पर्धांबद्दल कुतूहल जागृत होत आहे हे मात्र या स्पर्धेत जवळजवळ ५०० स्पर्धकांनी भाग घेतला आहे त्यावरून दिसून येते.

या स्पर्धेतला स्पृहणीय विषय म्हणजे स्वतःच्या जीवनाकांक्षांचा आराखडा वास्तव व कल्पित या दोन्ही पातळ्यांवरून करण्याची योजकता. स्वतःच्या जीवनाबद्दल माणसाला स्वाभाविकच आत्मीयता असते. परंतु स्वतः चोखाळलेल्या मार्गाचे समर्थन अगर धिक्कार करण्याच्या प्रक्रिया प्रगट करण्याची क्रियाही माणसांत नेहमीच आढळून येते. या क्रियेची लिखित वाटचाल या स्पर्धेच्या योजनेत आढळते. कुठे जाणार, हा प्रश्न प्रत्येकालाच सतावीत असतो. 'कुठे गेलो' याचे उत्तर सुखदुःख समिश्र असते. तर जायचे कुठे, तर विनाशाकडेच हेही अनेकांना अनुभवाने उमगते. या स्पर्धेच्या उत्तरात पुढच्याची आशा, सद्यःस्थितीतली उभारी व निराशा आणि वास्तवाचे अनुभव या साऱ्यांचे दर्शन होते.

स्पर्धेत कुठलेच निवेदन प्रथम श्रेणीचे नाही. पण बरीच निवेदने वस्तुस्थितीला धरून आहेत.

यातल्या स्पर्धकांनी विविध मार्ग विविध कारणासाठी अनुसरले आहेत. त्या त्या मार्गांचे स्पष्टीकरणही प्रत्येकाने आपापल्या कुवतीप्रमाणे दिले आहे. आता प्रत्यक्षात काही उदाहरणे पाहू. ज्यानी गावी शेती करण्याचा निर्णय घेतलेला आहे, त्यांची निवेदने बहुशः साधी व सरळ आहेत. एका स्पर्धकाला त्याच्या व्यवसायात कृषीचे शिक्षण मिळाले. ही संधी त्याला उपकारक ठरली. नोकरीतून निवृत्त झाल्यानंतरच त्याने गावी जाऊन शेती करण्याचा निर्णय घेतलेला आहे. दुसरा एक स्पर्धक इंजिनियर होऊ इच्छित होता. परंतु घरची परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे ते

शिक्षण त्याने घेतले नाही. त्यातही सध्या इंजिनियर लोकांची बेकारी त्याने ध्यानात घेतली. शेवटी वैतागून त्याने शेतीकडे जायचे ठरवले. तिसरा स्पर्धक घरची शेती होती म्हणून तिच्यात शिरला. एकाने शेती हाच सध्याच्या परिस्थितीत उत्कृष्ट व उपयोगी व्यवसाय म्हणून पत्करला आहे. शेतीचा व्यवसाय पत्करणारे सुमारे पंधरा सोळा स्पर्धक आहेत, आणि एकंदर स्पर्धकांची संख्या पावणे पाचशे आहे.

कलावंत म्हणजे नट, गायक वगैरे होऊन रसिकांकडून मान्यता मिळवणारांची संख्या बरीच आहे. मात्र यात चित्रकारांची उपस्थिती आढळत नाही. एक दोघांनी चित्रकलेचे शिक्षण घेतल्याचे तेवढे उल्लेख आहेत. या वर्गात पद्मश्रीला फारच भाव आहे. साधारणपणे या स्पर्धेत पद्मश्रीला अवास्तव मोठेपण प्राप्त झालेले आहे. पद्मश्री हे या कलावंतांना सर्व मानसन्मान संपल्यानंतरचे अखेरचे श्रेय वाटते आहे असे दिसते. रसिकांची मान्यता मिळवणाऱ्या या कलावंतात कथा–कादंबरी व नाटक लिहिणाऱ्यांचाही समावेश झालेला आहे. अशापैकी एका स्पर्धकाने स्पर्धा-चित्रातले दोष दाखवले आहेत. मार्ग निवडण्यात त्यामुळे अडथळा होतो असे त्याचे म्हणणे आहे. कादंबरी लिहून साहित्यसेवा करून राष्ट्रपति–पदक मिळवावे, साहित्य परिषदेचा अध्यक्ष व्हावे व अखेर पद्मश्री मिळवावी असा त्याचा मनोदय आहे. दुसरा एक स्पर्धक पोरका मुलगा असतो. लोकांकडून पुस्तके घेऊन शिकतो. परंतु हा स्पर्धक दुसऱ्याच परिच्छेदात म्हणतो की, घराचे भाडे आपल्याला मिळत होते म्हणून पदवी घेणे शक्य झाले. ही विसंगती लक्षणीय आहे. पदवीनंतर नोकरी न करता त्याने रेडियो व मासिकासाठी लेख लिहिले. आणि अशा तऱ्हेने रसिक-मान्यता मिळवली. दुसरा एक जण नट व कादंबरीकार होऊन यश मिळवतो. एक जण लेखक केशवसुत, गडकरी यांच्याप्रमाणे कलावंत म्हणून यश मिळावे असे इच्छितो. आपल्यावर उत्तम मृत्युलेख यावा ही त्याची कामना आहे. एकाने सर्वात मोठा व वळणाचा मार्ग निवडला आहे. संगीत व अभिनय यात रसिकांनी आपले कौतुक करावे हे त्याचे ध्येय आहे. शिक्षण अर्धेच होते. पुढे स्वावलंबनाने पदवीधर होतो. तो संगीत, अभिनय व साहित्यसेवाही करतो. साहित्यसभेचे अध्यक्षपद मिळवतो, ग्रामपंचायतीत त्याला स्थान देऊ केले जाते. तो सिनेनट होतो व पद्मश्रीने त्याच्या कर्तबगारीला मुगुट चढतो. एक जण चित्रपट व्यवसायात शिरतो. त्यात त्याला यश मिळते; पण घरच्या माणसांचा विश्वास तो गमावून बसतो. रसिकांची मान्यता मिळते, पण एकलेपणाची चिता त्याला पोळीत असते. रसिकांच्या नक्राश्रूंनी ती आग विझत नाही. एकाचे वर्णन फारच अफाट आहे. तो म्हणतो की घरची गरिबी. शिक्षण सोडून नोकरी करणे प्राप्त झाले. एकदा चित्रपट–डायरेक्टराच्या पुढे याने गाणी म्हटली. तेव्हा त्या डायरेक्टराने खूष होऊन याला अमेरिकेला नेले. तिथे तो पीएच. डी. झाला. पुढे चीनचे आक्रमण झाले तेव्हा तो कलापथकात गेला. त्याने नंतर ग्रामविकासात भाग घेतला. कादंबरी लिहिली. तिचे नाव 'गरिबांचे

मनोरथ.' तिला अवॉर्ड मिळाले. त्या कादंबरीवर चित्रपट. 'अखेर पद्मश्रीने त्याला माळ घातली. एक कलासक्त गृहिणी नाटकात कामे करते. तिला पद्मश्री मिळते. एकीने नटीचे जीवन चांगले रंगवले आहे. एंजिनियरिंग कॉलेजमध्ये गेलेला एक जण देखील कलेची सेवा करून पद्मश्री मिळवतो. एकाने म्हटले आहे की, 'ना. गो. कालेलकरी मार्ग नको. ग. दि. माडगूळकर मार्गच छान आहे.' परदेशगमन, डॉक्टर, इंजिनियर, शास्त्रज्ञ अधिक करताना दिसतात. एकाचे उद्दिष्ट मंगळावर जावे असे आहे. विशिष्ट काही ध्येय नसताना काही तरी करून परदेशी जायचेच असेही म्हणणारे स्पर्धक आहेत. एक एंजिनियरिंगचा विद्यार्थी भारतात त्या व्यवसायात बेकारी असल्यामुळे परदेशी जाण्याचे ठरवतो. तर डॉक्टर तिथे अधिक तज्ञता मिळवण्यासाठी जातो.

आपला नोकरी-धंदा नीट संभाळून स्वतःचे लहान अगर मोठे घर असावे, मोटार असावी असे म्हणणारांची बहुसंख्या आहे. डॉक्टरला स्वतंत्रपणे राहता येते म्हणून एक जण तो धंदा पत्करतो. एक मुलगी, बाई तिचे शाळेत कौतुक करतात, तेव्हा पुढे आपण पीएच्. डी. होऊन स्वतःची शाळा काढावी असे म्हणते. एक जण दिल्लीतल्या उच्चपदस्थ व्यक्तींवर तुटून पडतो. एक जण म्युनिसिपालिटीत शाळेत नोकरी करून लहान घराचे स्वप्न पाहातो. तो म्युनिसिपालिटीच्या सावळ्या गोंधळावर व पाठ्यपुस्तकातल्या गोंधळावर टीका करतो. एक जण प्राध्यापक होऊन स्वतःचा बंगला बांधू पहातो. एक जण बँकिंगकडे जातो व हे यश पदरात पाडून घेतो. एक जण मुद्रण व्यवसायात यश मिळवतो. मिळेल ती नोकरी व शेवटी आपले घर हा सामान्यपणे बऱ्याच जणांचा मनोदय दिसतो.

आता स्पर्धेत विजयी झालेल्यांचे थोडेसे निरीक्षण करू या. नंदकुमार बा. देशपांडे पहिले आहेत. कायमचे परदेशगमन यांनी देशहिताप्रीत्यर्थच स्वीकारले आहे. परदेशगमन देशद्रोह नव्हे तर इथल्या बेकारीला एक पर्याय आहे म्हणून तो स्वीकारायचा व आपल्या देशबांधवांना परदेशी साहाय्य करण्याची त्यांची मनीषा आहे. पण परदेशी जाण्यापूर्वी उत्तम विद्यार्थी होणे आवश्यक आहे. ती पातत्रा मिळवण्यासाठी त्यांचा प्रयत्न चालू आहे.

दुसरा क्रमांक अनिल रामचंद्र तिकोटेकरांचा आहे. घरच्या परिस्थितीमुळे उच्चशिक्षण मिळवण्याची महत्त्वाकांक्षा सिद्धीस गेली नाही. नोकरी करणे प्राप्त झाले. कॉलेजच्या फी वाढीविरुद्ध मोर्चाचे पुढारीपण केल्यामुळे कॉलेजमधून बाहेर पडावे लागले. पुढे टायपिंगमध्ये तरबेज होऊन नोकरी सांभाळून त्यांनी पदवी संपादन केली. पुढे ते ऑफिसर झाले. सन्मानाने जीवन जगण्याचे समाधान ते भोगीत आहेत

मुद्रण व्यवसायात शिरलेल्या सु. ग. राजोपाध्ये यांनी भांडवल नसताना या धंद्यात फक्त जम बसवला याचे निवेदन केले आहे. आपल्या छापखान्यात त्यांनी पुढे मासिकही काढले. यांना पद्मश्री मिळाली.

शैलजा द. भिडे गायिका व अभिनेत्री होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगतात. प्रथम त्या डॉक्टर होणार होत्या. तसे न झाल्याची रुखरुख त्यांना लागते. पण त्यांच्या मार्गात यश मिळाल्याने ती बोचणी फार काळ टिकत नाही.

सौ. अंजली ठकार यांनी तर चक्क कविता व त्याही विनोदी दिल्या आहेत.

मी तो अकलेचा कांदा । ऊगा सुरू केला धंदा ।।
फंदात या आला बांधा । साफ की बुडाला ।।

त्या कांकणे विकायचा धंदा करतात व बुडतात. मग शेतीकडे वळतात व 'तेचि खेडे देगा देवा' असे म्हणतात. शहराला विटतात. त्या उसाची लागवड करतात व पैसाच पैसा मिळवतात.

या स्पर्धेत कुठे जायचे ते कळत नाही, अंदाज लागत नाही असे म्हणणारेही स्पर्धक आहेत. एकाने अंदाज लागत नाही असे म्हटले आहे. त्याने रसिकमान्यता, साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद, पद्मश्री वगैरे सर्व मिळवले असूनही त्यात त्याला आता अर्थ वाटत नाही.

पत्रकारही स्पर्धक एखाददुसरा आढळतो व त्याचे धोरण आक्रमक आढळते.

असा आहे या स्पर्धेचा एकंदर प्रपंच.

**दुर्गा भागवत**

## नंदकुमार देशपांडे । क्रमांक एक




कोठलाही मार्ग निवडला तरी तो शेवटी पैसा मिळवण्यातच परिवर्तीत होणार आहे. आज पैशाशिवाय काहीही चालत नाही. त्यामुळे अधिकाधिक पैसा मिळवणे व त्यायोगे अधिकाधिक सुखसोयींनी आपले जीवन समृद्ध करणे हे प्रत्येक सामान्य

माणस आपले ध्येय धरून चालत असतो. मला खूप शिकावयाचे आहे आणि त्यासाठी मी खाजगी शाळेचा मार्ग धरला. खाजगी शाळेतच शिकण्यात दोन हेतू आहेत. एक म्हणजे तेथे शिक्षक वैयक्तिक लक्ष प्रत्येक विद्यार्थ्याकडे देऊ शकतात व दुसरे असे की, खाजगी शाळेत अनेकविध सुखसोयी — अभ्यास व अभ्यासेतर विषयांसंबंधी — उपलब्ध असतात. स्वतःच्या आवडीच्या विषयात प्रगती करून एस्. एस्. सी पर्यंत मार्ग आक्रमल्यानंतर कॉलेजचा रस्ता सुरू होतो. कॉलेजात विविध विषयांची उपलब्धता, मनाला अधिक आवडीच्या विषयांच्या अभ्यासाला, उद्युक्त करते. कॉलेजमध्ये अभ्यासात चमक दाखवून पदवी मिळवावयाची. पदवी उत्तम मार्कांनी मिळाल्यावर प्रयत्न आणि कष्ट करण्याची मनाची तयारी ठेवली. प्रयत्नाने व कष्टांनी साध्य न होणारी अशी या जगात कोणतीच गोष्ट नाही. परदेशगमन उच्च शिक्षणासाठी अवश्यक आहे. जगातील वाढत्या व अफाट ज्ञानाच्या कक्षा क्षणाक्षणाला वाढत आहेत. सर्व क्षेत्रे आपल्या देशात उपलब्ध होऊ शकणार नाहीत त्यामुळे ते ज्ञान आत्मसात करण्यासाठी परदेशाची वाट धरावीच लागेल. प्रत्येकाच्या आवडीचा विषय हा वेगवेगळा असू शकेल. परदेशगमनाची वाट लांबची व खडतर आहे, तरी स्वतःच्या प्रयत्नाने ते साध्य केलेली अनेक उदाहरणे डोळ्यासमोर आहेत. आता कायमचे परदेशगमन हे मात्र काही जणांना देशद्रोही कृत्य वाटते. आणि याचे मुख्य कारण म्हणजे देशाची बुद्धी दुसरीकडे उपयोगात आणली जाते. ज्या समाजाने व राष्ट्राने त्याला शिक्षण दिले त्यांना त्याच्या शिक्षणाचा उपयोग होत नाही. कायमचे परदेशगमन करणाऱ्यांच्या देशभक्ती व देशप्रेमाबद्दल शंका व्यक्त करण्यात येते. पण या प्रश्नांनादेखील उत्तर आहे. लोकशाही मतस्वातंत्र्याच्या जमान्यात माझ्या आवडीच्या विषयात मी विशेष अभ्यास करणे हे केव्हाही गैर होणार नाही. याउलट माझा अभ्यास माझ्या देशाला उपयुक्त न होण्याची पुष्कळ शक्यता आहे. पण म्हणून मी अभ्यासासाठी व नोकरीसाठी कायमचे परदेशगमन केल्याने देशद्रोह होतो हे म्हणणे बरोबर नाही कारण आज आपल्या देशात बेकारीचा प्रश्न तीव्र आहे. परदेशात कायमची नोकरी धरणे ह्यामुळे बेकारीचा प्रश्न कमी तीव्र होण्यास मदतच होणार आहे. परदेशातून स्वदेशातील स्वकीयांना पैशाच्या रूपाने मिळणारी मदत ही देशाला, तशीच घरच्या लोकांना मदत म्हणून होतच राहील. बरे, यावर जरी स्वदेशात नोकरी करण्याचे ठरविले तरी संधीची विषमता जी आज आपल्या येथे प्रकर्षाने वसत आहे, त्यामुळे ते देखील शक्य होणार नाही. आपण मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग व वाढ जर स्वदेशात राहून होणार नसेल तर परदेशात कायमचे वास्तव्य हे दोषकारक होणार नाही. एक कुटुंब परदेशात कायमचे वास्तव्य करण्यास गेल्यास, त्याच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या अनेक प्रश्नांची सोडवणूक सोपी होणार आहे. एका खेड्यातील मुलगा अधिक शिक्षण मिळवून शहरातच नोकरीस लागला व तेथेच कायम

वास्तव्य करून राहिला तर त्याचा तो आपल्या गावाशी द्रोह होत नाही. तसेच एका राज्यातून शिक्षण घेऊन दुसऱ्या राज्यात नोकरीनिमित्त कायमचे वास्तव्य, हे जसे आपल्या राज्याशी बेईमानी दर्शवित नाही, तसेच परदेशगमन व तेथेच कायमचे वास्तव्य ह्याचा स्वदेशहिताशी थोड्याफार फरकाने ह्याच संबंध आहे. खेड्यातील मुलाने आपल्याच खेड्यात परतून आपला अभ्यास व ज्ञान व्यर्थ घालविण्यापेक्षा, शहरात राहून त्याला खेड्याचे हित आपल्यापरीने करता येईल. आपले ध्येय साकार होईपर्यंत प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचे प्रथमपासून ठरविले असल्याने कष्ट करण्यास मन कधी कचरले नाही. अडचणींवर मात करण्यात पुरुषार्थ वाटला. प्रयत्नांनी ध्येय गाठल्यामुळे ध्येयप्राप्तीचा आनंद अवर्णनीय होता. आपण जे ठरवू ते प्रयत्नाने करू शकतो ह्याबद्दल आत्मविश्वास वाढला. कायमच्या परदेशवास्तव्यासाठी परदेशगमन करीत असलो तरी स्वदेशहित दृष्टीआड होऊ देणार नाही हा निश्चय आजच करीत आहे. परदेशात येऊन ज्ञान प्राप्त करून परत स्वदेशात जाणाऱ्या स्वदेशवासियांना परदेशात मदतीसाठी स्वदेशी लोकांची आवश्यकता वाटते. ती माझ्यासारख्यांना पुरवता येईल.

या मार्गाने गेल्यामुळे माझ्याजवळ शेवटी ३ मोहरा शिल्लक राहिल्या. ◻

## अनिल तिकोटेकर । क्रमांक दोन



१. घरच्या परिस्थितीमुळे वडिलांनी मला म्युनिसिपल शाळेत घातले. त्यामुळे इंग्रजी माध्यम असलेल्या शाळेत जाण्याचे माझे मनोरथ ढासळले. त्याबद्दल फारसे वाईट वाटून न घेता अभ्यास करून एस्. एस्. सी. झालो.

मॅट्रिकनंतर कॉलेजात जाण्याची माझी फार इच्छा होती. पण फी-पुस्तके वगैरेची सोय करणे वडिलांना शक्य नव्हते. अशा निराश मनःस्थितीत असताना एका मित्राने एका मोठ्या व्यक्तीस जाऊन भेटण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे त्या मान्यवर व्यक्तीस मी भेटलो. त्या व्यक्तीने मला काही सवलती देऊ केल्या व त्या सवलतीच्या आधारे मी कॉलेजात जाऊ लागलो. पहिल्या वर्षी मी योग्य तऱ्हेने पास झालो.

दुसऱ्या वर्षीच्या सुरुवातीस कॉलेजच्या फीमध्ये वर्षाला एकूण १०० रुपये वाढ झाली. कॉलेजातील पुष्कळ विद्यार्थी असे होते की ज्यांचे वडील अगदी गरीब होते, तरीपण काहीतरी करून आपल्या मुलांना शिकवण्याचा त्यांचा इरादा होता. ही वाढ झाल्यामुळे विद्यार्थी व पालक हतबल झाले. त्यांना ही फी भरणे अशक्य आहे असे वाटू लागले. हे सर्व जेव्हा मला समजले तेव्हा झालेल्या अन्यायाबद्दल माझे मन बंड करून उठले.

मी व्यक्तिश: कित्येक विद्यार्थ्यांना भेटलो व फी–वाढीविरुद्ध मोर्चा काढला. मोर्च्याचा उद्देश शांतपणे फी–वाढीस, विरोध दर्शविणे हाच होता. तो सहज सफल होईल असे मला वाटले. पण नाही. काही गुंड विद्यार्थीही त्या मोर्च्यात होते. त्यांनी दगडफेक केली, अचकट विचकट घोषणाही दिल्या. या मोर्च्यामुळे घबराटीचे वातावरण निर्माण झाले व पोलिसांनी मला पकडून नेले.

दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात 'विद्यार्थ्यांची हुल्लडबाजी' या मथळ्याने ह्या मोर्च्याचे स्वागत झाले. तसेच 'हुल्लडबाज विद्यार्थ्यांचा नेता' म्हणून माझा उल्लेख केला गेला. ही माझी (कीर्ती) त्या सद्गृहस्थाच्या कानावर गेली. त्यांनी मला मदत करण्याचे बंद केले व अशा तऱ्हेने मला कॉलेज अर्धवट सोडावे लागले.

कॉलेज सोडल्यानंतर उपजीविकेसाठी काहीतरी करण्याची आवश्यकता मला वाटू लागली. त्यादृष्टीने मी नोकरीसाठी प्रयत्न करण्यास सुरुवात केली. पण लवकरच नोकरी मिळण्याची आशा पार मावळली. याचे कारण म्हणजे एकतर मी फक्त मॅट्रिकच होतो व दुसरे म्हणजे मला टायपिंग चांगल्या तऱ्हेने येत नव्हते. कॉलेजमध्येच सवलत म्हणून टायपिंग शिकावयास मिळत होते. पण तोही मार्ग आता बंद झाला होता.

मग मी पडेल ते काम करून पैसे मिळवण्यास सुरुवात केली. काही दिवसानी दोन-तीन व्यक्तींच्या मदतीने मला वर्तमानपत्रांचा उद्योग करता येऊ लागला. यामुळे माझे दोन तऱ्हेचे फायदे झाले. एक म्हणजे मला इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रे वाचावयास मिळू लागली व त्यायोगे माझे इंग्रजी सुधारत गेले. दुसरा फायदा म्हणजे यातून मिळणाऱ्या पैशातून मी टायपिंगचा क्लास सुरु केला व चांगल्या तऱ्हेने टायपिंग शिकलो.

नंतर मला थोड्याशा खटपटीनंतर नोकरी मिळाली व मग मी आपले लक्ष अभ्यास व नोकरीवर केंद्रित केले. बाहेरून परीक्षेस बसून मी पदवी मिळवली. नंतर कामावर लक्ष केंद्रित करून चार वर्षात ऑफिसर झालो व सुखी नागरीक बनलो.

२. शाळेत जायला सुरुवात केल्यापासून अडचणी यावयास सुरुवात झाली. कधी फी भरण्यास पैसे नसायचे तर कधी पुस्तके नसायची. मन अत्यंत निराश व्हावयाचे


तरीपण या अडचणीवर मात केल्यानंतर एक प्रकारचा स्वतःबद्दल आत्मविश्वास वाटायला लागला. हा आत्मविश्वासच मला पुढे अनेक कठीण परिस्थितीत उपयोगी पडला. त्यामुळे कितीही अडचणी आल्यातरी डगमगलो नाही.


३. लहानपणी जी एक महत्त्वाकांक्षा होती, खूप शिक्षण घेण्याची, लोकांच्या डोळ्यासमोर एक आदर्श ठेवण्याची, तिची पूर्ती या जन्मीतरी होणे शक्य नाही, असे मुक्कामास पोचल्यानंतर वाटले. तरीपण अगदीच जमीनदोस्त होण्यापेक्षा माझे समाजातील स्थान काहीसे चांगले आहे, यात समाधान वाटते. असा एक विचार चमकून गेला की आपण कॉलेजमधील फी-वाढीविरुद्ध चळवळीत पडलो नसतो तर निश्चितच आपल्या महत्त्वाकांक्षेला आकार आला असता. आणि आपण सध्या आहोत त्यापेक्षा अधिक काहीतरी झालो असतो. आपण करायला जावे एक व व्हावे भलतेच अशी स्थिती झाली.

असे असले तरी योग्य प्रश्नास वाचा फोडल्याबद्दल अजूनही मला समाधान वाटते. वाईट एवढेच की त्याचा उपयोग फी-वाढ रद्द न होता माझे कॉलेजमधील शैक्षणिक जीवन संपुष्टात येण्यात झाला. अर्थात हे खरे की मोर्च्याचा असा काही दुरुपयोग न होईल अशी काळजी घेऊन त्याप्रमाणे उपाययोजना करावयास हवी होती. पण काही हरकत नाही. आता यापुढे तरी असा आंधळेपणा माझ्याकडून होणार नाही.

अडचणीच्या प्रसंगी एकवेळ उपाशी राहून मी माझे शिक्षण व घरातील कुटुंबांची जबाबदारी पार पाडली, तसेच माझ्या जीवनास अविचाराने कोणतेही वाईट वळण लागू दिले नाही, याबद्दल अजूनही मला अभिमान वाटतो, समाधान वाटते.

४. सुरुवातीला तीन मोहोरा होत्या. एक सुरुवातीला तळ्यापाशी खर्च झाली. दुसरी मोहोर दुसऱ्या तळ्याजवळ दिली. तिसरी मोहोर एस्. एस्. सी. च्या ठिकाणी टाकली. अशा रीतीने तिन्ही मोहोरा खर्च झाल्या. पण एक मोहोर मला 'कष्ट' या ठिकाणी मिळाली. म्हणजे मुक्कामास पोचल्यानंतर माझ्याकडे एक मोहोर शिल्लक होती. □





डी. जी. ओहोळ

# एक व्यासंगी धन्वंतरी

एस्. ए. कुलकर्णी

"तू परीक्षेत उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाल्याबद्दल हे तुला बक्षीस !" म्हणत एका प्रेमळ पित्याने आपल्या मुलाच्या हातात एक नवे कोरे इंग्रजी गोष्टीचे पुस्तक दिले. मुलगा केवळ आठ वर्षांचा होता. नुकतीच कुठे त्याला इंग्रजी मुळाक्षरांची ओळख झालेली. सुंदर चित्रांचे व मोठ्या अक्षरांचे ते पुस्तक पाहून मुलाला खूप आनंद झाला. या निमित्ताने मुलाने इंग्रजी हळू हळू वाचत राहावे हा पित्याचा आंतर:कोप्पी हेतु होता. मुलाने आपल्या चिमुकल्या हाताने त्या पुस्तकावर नाव लिहिले. पण कसे ? "डी. जी. ओहोळ, एम्. बी. बी. एस्. !" आपण मोठे डॉक्टरच

होणार ही त्याची महत्त्वाकांक्षा त्याच्या त्या लिखाणातून व्यक्ती झाली. वर्ड-स्वथच्या 'रेनबो' या सुप्रसिद्ध कवितेमधील 'दि चाईल्ड ईज दि फादर ऑफ् दि मॅन' या सुरम्य पंक्तीचा तो ज्वलंत पुरावा होता.

मुलाची ही महत्त्वाकांक्षा पुरी होणार कशी? त्याचे वडील श्रीमंत थोडेच होते? एका प्राथमिक मिशन शाळेतील ते एक मराठीचे शिक्षक. जेमतेम उदर-निर्वाह चालेल इतपत आर्थिक शिदोरी – वडिलांना, इतर कुटुंबियांना चुकूनही वाटले नाही की हा मुलगा डॉक्टर होईल–वीस पंचवीस हजार रुपये वर्षानुवर्षे जेव्हा मोजावेत तेव्हा एक डॉक्टर समाजात निर्माण होतो – कॅपिटेशन फीच्या (अधिकृत लाच) अलीकडच्या जगात तर हा सौदा पन्नास हजाराच्या घरात जातो. पण जबर महत्त्वाकांक्षा, परिश्रमाची कमाल, गरीबीतून वाट काढावयाची विलक्षण हिम्मत याच्या जोरावर तो मुलगा नुसता एम्. बी. बी. एस्.च झाला नाही; तर शरीरविकृतिशास्त्र (पॅथॉलजी) आणि जिवाणुशास्त्र (बॅक्टिरियॉलॉजी) हे विषय घेऊन एम्. डी.ही झाला.

डॉ. ओहोळ यांचे शिक्षण किती कष्टाने पार पडले, त्यांनी किती हालअपेष्टातून आपला मार्ग काढला हे सारे, किंबहुना त्यांचे सारे जीवनच आदर्शमय आहे. विद्यार्थ्यांना तर खासच आहे. त्यांचा जन्म कोडोली-पारगाव येथे झाला. मराठी चौथीपर्यंतचे त्यांचे शिक्षण या खेड्यातच झाले. नंतर वडिलांची बदली वेंगुर्ल्याला झाली. वडील हायस्कूलचे मास्तर झाले – फक्त मराठी विषयापुरतेच. डॉ. ओहोळ वयाच्या १६ व्या वर्षी मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले ते घवघवीत यश मिळवून. भौतिकशास्त्रात त्यांनी ८४ टक्के गुण मिळविले. वेंगुर्ला हायस्कूलमधील त्यांचा हा विक्रम अद्यापि अबाधित आहे. एका वक्तृत्वस्पर्धेमध्ये त्यांनी पहिले पारितोषिक मिळविले – ते कै. रँग्लर र. पु. परांजपे यांच्या हस्ते. त्यांच्या भाषणाचा विषयही काही साधासुधा नव्हता! "हाऊ यु कॅन इंप्रूव्ह युवर कंट्री बेटर" असा तो अवघड विषय होता. विशेष म्हणजे भाषणाचा विषय फक्त चोवीस तास अगोदर समजलेला.

याच सुमारास दुसऱ्या महायुद्धाचे रणशिंग फुंकले गेले. आर्थिक परिस्थिती जिकिरीची होत गेली. पुढील शिक्षणाची अंगात धमक असून, जिद्द असून, तीव्र इच्छा असूनही डॉ. ओहोळ काही काळ आयुष्यात पराभूत झाले. मिरजेच्या मिशन दवाखान्यात कार्यालयामध्ये लेखनिकाची नोकरी स्वीकारणे त्यांना क्रमप्राप्त झाले. पण परमेश्वर कुठे ना कुठे, कुणाच्या हस्ते परहस्ते का होईना मदतीस येतो, ही एकच आशा त्यांच्या मनात होती. मॅट्रिकला असे उत्कृष्ट यश मिळविणारा हा होतकरू मुलगा लेखनिकाच्या व्यवसायात पडून वाया जातो आहे याची जाणीव बाळगून, प्राचार्य रामदास यांनी स्वतःचे पाचशे रु. देऊन ओहोळना मुंबईच्या विल्सन कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून दिला. पुढे शिष्यवृत्तीही मिळाली. तेव्हा या

तरुण जिद्दीच्या मुलात आत्मविश्वास निर्माण झाला असल्यास नवल नाही. मिळेल ते खावे, कशाही अडचणीत राहावे – पण नेटाने अभ्यास करावा एवढेच ध्येय त्यांच्या डोळ्यासमोर उभे होते. इंटर सायन्सनंतर मिरज मेडिकल स्कूलमध्ये ते एल्. सी. पी. एस्. साठी दाखल झाले. ओहोळांचे स्वप्न त्यांच्या दृष्टिपथात येऊ लागले. एकाच वेळी ते एल्. सी. पी. एस्. आणि एल्. एम्. पी. परीक्षा उत्तीर्ण झाले. एक सरकारी परीक्षा तर दुसरी मेडिकल बोर्डाची. एकाच वर्षी दोन्ही परीक्षा देऊन त्यांनी आणखी एक विक्रम प्रस्थापित केला. पुढे मिशन दवाखान्यात वेगवेगळ्या खात्यात त्यांनी नोकरी केली. (इन् टर्न, रेसिडेंट डॉक्टर या नात्याने) हा हा म्हणता त्यांना बढती मिळत गेली. विकृतिशास्त्राचे (पॅथॉलजी) ते रेसिडेंट डॉक्टर झाले. रोग्यांचे मल-मूत्र-रक्त याची तपासणी करून रोगनिदानासंबंधी त्यांनी पाठविलेला अभिप्राय व अहवाल बडे बडे धन्वंतरी आणि शल्यचिकित्सक शिरोधार्य मानू लागले. नंतर ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये एम्. बी. बी. एस्. साठी ते दाखल झाले. मिशनमधला तुटपुंज्या पगारावर कुटुंबियांचा चरितार्थ इकडे चालावा आणि स्वत: थोडे फार घरगुती उपचार करून जरूरीपुरते पैसे मिळवावे व आपला खर्च चालवावा – अशा हलाखीतून ते एम्. बी. बी. एस्. झाले. बालपणी आपल्या चिमुकल्या हाताने आपल्या नावापुढे पदवी लिहिण्याचा त्यांचा छंद प्रत्यक्षात अशा रीतीने हाती आला.

डॉ. ओहोळ मिरज मिशन दवाखान्यात पुन: आपल्या कामावर रूजू झाले. त्यांच्या कामकाजात अधिकाधिक प्राविण्य प्राप्त झाले. त्यांच्या चिकित्सेला अधिकृत स्वरूप (अॅथॉरिटी) आले. मिरज मेडिकल सेंटरमध्ये मेडिकल कॉलेज काढण्याचा निर्णय घेण्यात आल्याबरोबर डॉक्टरना वाटू लागले की, आता पदव्युत्तर उच्च शिक्षण संपादन केल्याविना आपले पुढे नडणार – तेव्हा एम्. डी. होण्याचा निश्चय त्यांच्या खंबीर मनाने एकवार केला. घेतलेला निर्णय पदरी पडेपर्यंत अस्वस्थ राहणे ही त्यांची मूळ मनोवृत्ती. त्यांनी अभ्यासाची रजा मिळविली आणि ते मुंबईला दाखल झाले. प्रो. आर. के. गाडगीळ यांच्या निदर्शनाखाली एम्. डी. च्या संशोधनाला त्यांनी सुरुवात केली व याही खेपेस स्वत:चा खर्च स्वत:च्या कष्टानेच मिटविला. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चच्या एका योजनेत रिसर्च ऑफीसर म्हणून नोकरी करीत करीत त्यांनी आपले संशोधन चालू ठेवले. कॅड-व्हरिक ब्लड ट्रॅन्सफ्यूजन (प्रेताचे रक्त जिवंत माणसात घालण्याची क्रिया) या मूलभूत अवघड विषयावर त्यांचे संशोधन आधारलेले होते. इंडियन अॅनॉटमी लॉनुसार प्रेताच्या शरीराचा कोणताही अवयव काढणे हा गुन्हा आहे. तेव्हा कायद्याचे भय त्यांना होतेच. तेव्हा मुंबईच्या कॅरोनरची परवानगी मिळवून हे प्रयोग कुत्र्यावर करण्याचे त्यांनी ठरविले. मुंबईसारख्या शहरात दररोज कितीतरी कुत्री कॉर्पोरेशनचे अधिकारी धरतात. अशी कुत्री महालक्ष्मीपासून व्हिक्टोरियामधून स्वत:

आणायची आणि त्यांच्यावर प्रयोग करावयाचे. केव्हा केव्हा जिवंत कुत्री आणून, त्यांना एकदम मारायचे (सडन डेथ) असा निर्दयी उपद्व्यापही त्यांना हळव्या मनाशी द्वंद्व खेळत करावा लागला. कुत्र्याचे रक्त काढून घ्यावयाचे, त्यातील घटक द्रव्यांची तपासणी करावयाची, ते जंतुविरहीत आहे की नाही याची शहानिशा करायची आणि मग जिवंत कुत्र्याचे रक्त काढून घेऊन (एक्झाविनेशन एक्स-परमेंट) तो मरणोन्मुख झाल्यावर मेलेल्या कुत्र्याचे अगोदर मिळविलेले रक्त त्याच्या शरीरात सोडून पाहावयाचे – अशा प्रयोगात बरीचशी कुत्री वाचल्याचे त्यांनी रेकॉर्ड निर्माण केले. अकल्पितपणे मरण पावलेल्या प्राण्याचे रक्त चार तासाच्या आत काढून घेऊन विशिष्ट तपमानात ठेवले म्हणजे ते गोठत नाही; किंवा ते बिघडत नाही; त्याचा वापर गरजेच्या ठिकाणी अगदी शास्त्रशुद्ध वैद्यकीय पद्धतीने करता येतो, हे त्यांनी आपल्या प्रबंधात सिद्ध केले, व त्या प्रबंधाला मुंबई विद्यापीठाने तथा इंडियन मेडिकल कौन्सिलने 'मूलभूत अभ्यास' म्हणून मान्यता दिली व डॉ ओहोळ एम्. डी. झाले. त्यांचा या विषयाचा अभ्यास हा भारतात प्रथमच केला गेलेला अभ्यास होता.

मिरजेस परत आल्यावर डॉ. ओहोळ मिशन दवाखान्यात शरीरविकृतिशास्त्राचे प्रमुख झाले आणि मेडिकल कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणूनही रूजू झाले. तथापि संशोधनप्रिय त्यांच्या मनाला ी खात्याची बंधने पेलवेनात. आपण नवीन काही तरी करावे या निदिध्यासाने त्यांनी मिशनची नोकरी सोडली. (अठरा वर्षांची प्रदीर्घ सेवा करून!) आणि गेली दीड वर्षे ते आपले स्वतःचे चिकित्सालय चालवीत आहेत. मिरजेत हिंदु धर्मशाळेसमोरील त्यांच्या चिकित्सालयात ते रात्रंदिवस आपल्या कामात निमग्न असतात. सांगली, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी इत्यादी आसपासच्या जिल्ह्यांमध्ये काही खाजगी चिकित्सालये आहेत; परंतु योग्य अभ्यासूने चालविलेले एकमेव चिकित्सालय म्हणून त्यांच्या आरोग्यधामाची ख्याती आहे. डॉ. ओहोळ आपल्या अद्यावत चिकित्सालयात रोग्यांचे रक्त-मल-मूत्र आदींची तपासणी तर करतातच – त्याशिवाय रोगांच्या गांठींचे पृथःकरण, रक्ताचा पुरवठा करणे, रोग्याला रक्त देणे आदी सर्व प्रक्रिया निष्णातपणे पार पाडतात. शक्य तितक्या कमी खर्चात मॅचिंग ब्लडचा पुरवठा करण्यामध्ये त्यांच्या लेबॉ-रेटरीची ख्याती असल्यामुळे त्यांचे आरोग्यधाम म्हणजे या भागातील डॉक्टर्स तथा रोग्यांचे एक विश्वसनीय केंद्र होऊन गेलेले आहे. ज्यासाठी डॉक्टरलोकांनाही मुंबईकडे धाव घ्यावी लागे, ते हातोहात डॉ. ओहोळांच्या चिकित्सालयामध्ये उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे त्यांच्या चिकित्सालयात चांचणीसाठी येणाऱ्या रोग्यांची अगदी रीघ लागलेली असते.

क्षणाची उसंत नाही अशा आपल्या कामातून वेळ काढून डॉक्टर वाचन आणि संशोधनात सदैव निमग्न होऊन जातात. कधी कधी त्यांना झोपही मिळत नाही.

" बेसिस ऑफ मेडिसिन इज पॅथॉलजी " या सूत्रावर त्यांची अत्यंत श्रद्धा असल्याने ते आपला अहवाल देताना परीक्षांची कुठेही कसूर होऊ देत नाहीत. त्यांची सही लाखमोलाची ठरलेली आहे – त्यामानाने ते आपल्यावरील जिम्मेदारी ओळखून असतात. आपल्या चिकित्सालयाचे स्वरूप जास्तीत जास्त मोठे करून पदव्युत्तर शिक्षणाची सोय करण्याचे ध्येय त्यांनी डोळ्यासमोर ठेवलेले आहे. त्यांच्या आत्मविश्वासू – खंबीर–जिद्दीच्या मनोवृत्तीवरून तो दिवस काही फार लांब आहे असे वाटत नाही.

कॅडव्हरिक ट्रॅन्स्फ्युजन व ट्रन्सप्लँटेशन (मृत मानवी शरीरातील रक्त गरजू मरणोन्मुख मानवाच्या शरीरात यशस्वीपणे घालणे, अवयवांची आदलाबदल करणे या अत्याधुनिक प्रक्रियांचा अभ्यास केवळ डॉ. ओहोळ यांच्या ठिकाणी असल्याने भारत सरकारच्या आरोग्य खात्याने त्यांचा सल्ला घेतलेला आहे. युद्धजन्य परिस्थितीत अशा प्रक्रियांची उपयुक्तता भारत सरकारला पटलेली आहे. ही प्रक्रिया सध्या फक्त रशियात चालू आहे. गेल्या ३० वर्षांपासून अशा ३५ हजाराहून प्रक्रिया रशियात झालेल्या आहेत. स्वतःचे रक्त दिल्यास दौर्बल्य येते – शक्तिपात होतो असा समज असलेल्या भारतासारख्या देशात कॅडव्हरिक ब्लड ट्रॅन्स्फ्युजन एक आवश्यक बाब होणार आहे हे सुस्पष्ट दिसते. त्या दृष्टीने भारत सरकारची पावले पडत आहेत. दरम्यान डॉ. ओहोळ आपले चिकित्सालय सर्व दृष्टीने संशोधनपूर्ण करून त्याचे रूपांतर यशस्वी संशोधन–विद्यालयामध्ये केल्याविना राहणार नाहीत. मिरजेसारख्या आडवळणी शहरात ते ऋषितुल्य जीवन जगून वैद्यकीय ज्ञानात भर घालीत आहेत – त्यामुळे त्यांना कितीही धन्यवाद दिले तरी कमीच पडतील.

□ □ □


## पुरंदऱ्यांची दौलत


**श्रीमंत बाजीराव पेशवे / तुळशीबागवाला / खासा फिरंगी माणिला / जिद्द / खासगीवाला / खंडेराव दरेकर / शिळवारीचे पाते / पालखी / पुरंदऱ्यांची दौलत**

**नऊ पेशवेकालीन कथा**

**ब. मो. पुरंदरे**

**किंमत : साडेतीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**



# मंत्रावेगळा

गेल्या काही वर्षात मराठीत बऱ्याच ऐतिहासिक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या लोकप्रिय होत आहेत व त्यांचा खपही वाढता आहे. म्हणून त्यांची विशेष दखल घेणे अत्यावश्यक झाले आहे. त्यांच्या लोकप्रियतेची संभाव्य कारणे त्यांच्यामधून प्रतीत होणाऱ्या सर्वसाधारण दृष्टिकोनाची ग्राह्याग्राह्यता यांची चर्चा येथे करावयाची आहे. कोणाला लेखनाचातुर्यामुळे व्यावसायिक यश व आर्थिक लाभ होत आहे म्हणून वाईट वाटण्याचे प्रयोजन नाही. परंतु कलेच्या व साहित्याच्या माध्यमातून कळत न कळत लोकशिक्षण होत असते. कलाकाराचा उद्देश नसला तरी त्याच्या कलाकृतीत व्यक्त होणाऱ्या विचारांचा, मूल्यांचा परिणाम लोकमानसावर होत असतो. आणि जेव्हा एखादी कलाकृती मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय होते, तिला पारितोषिके मिळतात व तिच्या कलात्मक सौंदर्यामुळे रसिकावर छाप पडते, तेव्हा तर त्यात स्वीकार केलेल्या मूल्यविचारांचा निश्चितच प्रसार होऊ लागतो. ही महत्त्वाची गोष्ट आहे.

हे मान्य केल्यावर एखाद्या कलाकृतीतून समाजास अहितकारक मूल्यांचा परिपोष सूक्ष्म रीतीने होत असेल तर त्या कलाकृतीवर झोड उठविली पाहिजे. या दृष्टिकोनातून लोकशाही समाजात सुद्धा अशा कलाकृतीवर बंधन आणण्याचा प्रयत्न

# आणि इतर ऐतिहासिक कादंबऱ्यांचे कुटुंब

वेळोवेळी झाला आहे. उदा. अश्लील साहित्याला झालेला विरोध. [ अर्थात त्या साहित्याच्या निकोपपणाबद्दल वेगळी चर्चा होऊ शकेल. ] ना. स. इनामदारांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या संदर्भात प्रभाकर पाध्ये यांनी मे १९६९ च्या सुमारास सोबत साप्ताहिकामध्ये अशाच दृष्टिकोनातून, सूत्ररूपाने चर्चा केली होती.

कलाकारावरचे बंधन समाजाच्याच हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. परंतु दडपशाहीने मतस्वातंत्र्य व विचारप्रसार यांच्यावर घाला घालणे योग्य आहे असा याचा अर्थ नव्हे. लोकशाही समाजात मूलगामी विचारजागृतीतूनच अपेक्षित बंधन येणे अशक्य असते. असो.

ऐतिहासिक कादंबऱ्यांचे पीक आज का आले आहे हे पहाणे मनोरंजक व उद्बोधक ठरेल. ही कारणमीमांसा करताना या कादंबऱ्यांच्या वाचकवर्गाकडे वळले पाहिजे. मुख्यतः हा वर्ग शहरी, शिक्षित, पांढरपेशा व ब्राह्मणी छापाचा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात या वर्गाचे मानस स्वातंत्र्यलढ्यात गुंतले गेले होते. स्वातंत्र्योत्तर काळात उघड कारणामुळे हा वर्ग राजकीय व सामाजिक नेतृत्वपदापासून दूर गेला आहे. यातून अर्थातच वैफल्य निर्माण झाले. हे वातावरण इतिहासकाळातील तथाकथित वीरपुरुषांचा पराक्रम, रोमांचकारी घटना यांच्या वर्णनात रममाण होण्यास पोषक आहे. त्यातून स्फूर्ती घेऊन आज धडाडीची विजिगीषू प्रवृत्ती पोसावी असा प्रकार वाटत नाही. कठोर शब्दांत सांगायचे तर सुप्त मनातील पलायनवाद वाटतो. अर्थात कोणी अशी स्फूर्ती घ्यावयाचे ठरविले तरी या साहित्यातून रंगविलेले नायक व त्यायोगे मांडलेले विचार समाजहिताला पोषक नसल्यामुळे झालाच तर परिणाम वाईटच होणार.

ऐतिहासिक कादंबऱ्यात सत्यापलाप करण्याचा हेतुपुरःसर प्रयत्न नसेल. परंतु माहितीच्या भांडारापैकी सौंदर्यवर्धनाला व नाट्यनिर्मितीला अनुकूल प्रसंगांची निवड अपरिहार्य आहे. ( या निवडीतून लेखकाच्या जीवनमूल्यांचे दर्शन होण्याची शक्यता आहे. ). हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी एक ठळक उदाहरण निव्वळ विवेचना-

साठी घेऊ. 'स्वामी' कादंबरीतील रमाबाईच्या सती जाण्याचा प्रसंग पहा. तिच्या पतिनिष्ठेने व अतुल धैर्याने रसिक भारावन जातो. परंतु तत्कालीन समाजामध्ये या अघोर, अमानुष चालीबद्दल तिटकारा तर नव्हताच, परंतु मान्यता होती. एवढेच नव्हे तर माधवरावासारखा समाजनेताही प्रतिगामी होता, ही काळी बाजू तो प्रसंग रंगवताना दृष्टोत्पत्तीस आणून दिली जात नाही. उलट झालाच तर गौरव होतो. नायक-नायिके भोवतालच्या तेजोवलयामध्ये ही बाब मिसळली जाऊन रंगसफेती केली जाते. [ म्हणजे रणजित देसाईंना सतीच्या चालीबद्दल प्रेम आहे असे आम्हाला म्हणायचे नाही. ] सतीची एक गोष्ट सोडा. पण समाजजीवनाच्या कोणत्याही अंगात प्रगती करण्याचे बुद्धिपुरःसर प्रयत्न झाल्याचे शिवाजीनंतर आढळत नाही. उदा. शिक्षणप्रसार, आर्थिक सुबत्ता, न्याय व सुव्यवस्था, कला, शिल्प इ. हा सार्वत्रिक उणेपणा या कादंबऱ्यांत कुठेही प्रतिबिंबित होत नाही. हा कोठला साक्षेपीपणा ? त्याचप्रमाणे भूतकाळातील वाईट चालीरीती, अशास्त्रीय मागास कल्पना व विचार, आधुनिक आदर्शांच्या दृष्टिकोनातून त्याज्य असे तत्कालीन राजकीय, सामाजिक जीवनाचे पैलू यांची थोरवीच लेखक गातात, तेव्हा त्यांची त्या गोष्टीस मान्यता आहे, असा समज होणे सहाजिक आहे.

आता येथे आधुनिक आदर्श कोणता ? तुमच्यापुढे कोणते पुरोगामी विचार आहेत की ज्या योगे तुम्ही या कादंबऱ्यातून दिसणाऱ्या विचारांना समाजहिता-वरोधी असा छाप मारता ? असे प्रश्न उपस्थित होणे शक्य आहे. ज्या समाजाने वैज्ञानिक दृष्टिकोन अंगिकारला आहे, दैववाद, अंधश्रद्धा यांना तिलांजली दिली आहे, जो समाज समान संधी, समता, व्यक्तिप्रतिष्ठा या तत्त्वांवर उभा आहे व संपन्न आहे तो आमचा आदर्श समाज.

ऐतिहासिक कादंबऱ्यांवर आमची आणखी एक हरकत आहे. हे कादंबरीकार कादंबरीच्या शेवटी संदर्भ ग्रंथांची यादी देतात किंवा प्रस्तावनेत आपण ऐतिहासिक संशोधनासाठी किती श्रम घेतले याची कथा सांगून संशोधकाचा आव आणतात. आपण इतिहासातील सत्याशी किती इमान राखले आहे हे पटवून देण्याची ती धडपड असते. जर यांच्यावर कुणी इतिहासाबाबत काटेकोरपणा न सांभाळल्याचा आरोप केला, तर त्यांचे उत्तर असते की, 'अहो, येऊन जाऊन हे ललित साहित्य. त्यात काटेकोरपणा किती पाळायचा ?" 'लेखकाच्या जाणिवा वाचकापर्यंत कितपत पोहोचल्या हे पहा.' (झुंज–पान ८) अशा प्रकारे ललित साहित्य व ऐतिहासिक संशोधन या दोहोपासून मिळणारी प्रतिष्ठा पटकविण्याचा प्रयत्न दिसून येतो.

कादंबरीकाराच्या वस्तुनिष्ठपणाचे हे उदाहरण पहा. ऑक्टो ६३ च्या 'मनोहर' मध्ये रणजित देसाई म्हणतात, "इतर सारे तपशील इतिहासात उपलब्ध असले तरी रमाबाईबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. रमाबाई हे एकच पात्र असे होते की, ज्याच्यावर मी संपूर्ण विचार करू शकत होतो.... रमा माझ्यापुढे अधिक अधिक

स्पष्ट होत होती... " तात्पर्य रमाबाईची व्यक्तिरेखा मुख्यत: कल्पनाविलासातूनच उभी राहिली आहे. आणि हा जर सर्व कल्पनेचाच खेळ असेल, तर ही रमाबाई सती जाणे टाळू पहात नसेल कशावरून ? ते मुळीच अशक्य नाही. पण कदाचित अशी नायिका वाचकाला रुचणार नाही, म्हणून बिचारीला जाळून घेण्यात धन्य वाटायला लावायचे. पुढे देसाई म्हणतात, ... " माझ्या कादंबरीत अप्रामाणिकपणा खासच नाही... (तिला) कसोटी लावलीच तर ती निव्वळ इतिहासाची न लावता प्रांजळपणाची लावली जावी "... म्हणजे इतिहाससंशोधनाची प्रतिष्ठा मिळण्यापुरती इतिहासाची कसोटी चालेल. पण काटेकोरपणाच्या वेळी आम्ही ललितकृतीची ढाल पुढे करणार. हे असे आहे. 'झेप'चे परीक्षणकारही ('आलोचना' जुलै १९६५) म्हणतात, " त्रिंबकजीच्या स्वभावाच्या चांगल्या बाजूने लेखक इतका भारावला आहे की, त्याचे दोषही त्याला गुणस्वरूप वाटतात. मग त्याची प्रत्येक कृती, उक्ती तो समजावून घेतो. त्याच्या वागण्याचे एक प्रकारचे समर्थन देतो. असा पूर्वग्रह मनात ठेवल्याने त्याच्या व्यक्तित्वाला एखाद्या तिऱ्हाइताकडून मिळावा तसा न्याय मिळत नाही.

या कादंबऱ्यांवर लिहिल्या गेलेल्या स्फुटांमध्ये ' लेखकाने अमुक घटनेला नवा अर्थ दिला, तमुक व्यक्तीचे नवीन पैलू उजेडात आणले, कोणा नायकाला न्याय मिळवून दिला, कोणाची सामाजिक प्रतिमा दुरुस्त केली. ' अशी प्रशस्तीपत्रे दिल्याचे वारंवार आढळून येते. हा सारा प्रकार अशास्त्रीय आहे. ती घटना, ती व्यक्ती याबाबत इतिहासतज्ञाजवळचा तपशील अपुरा असेल वा दृष्टिकोन चुकीचा असू शकेल. परंतु त्यात बदल करण्याची प्रक्रिया इतिहासशास्त्रात मान्य असलेल्या काटेकोर पद्धतीनेच झाली पाहिजे. त्याकरिता ललितकृतीचे माध्यम सर्वथा अयोग्य आहे. यावर इनामदारांचे म्हणणे पुढीलप्रमाणे. – " प्रत्येक पूर्वग्रह छाननी होऊन त्याचे ऐतिहासिक सत्यात रूपांतर होण्याची वाट पहायची म्हटले, तर मोठाच अनवस्था प्रसंग येईल. (त्याला शेकडो वर्षे लागतील). तोपर्यंत ललित साहित्याने ... थांबण्याचे कारण नाही. " (झेप, पान ७) म्हणजेच अपुऱ्या अभ्यासावर आधारलेले आपले नवे व्यक्तिगत पूर्वग्रह घुसडून कादंबरी लिहावी असा अर्थ. हा चुकीचा दुराग्रह होय.

हे झाले सर्वसाधारण ऐतिहासिक कादंबऱ्यांबद्दल. परंतु इनामदारांच्या ' मंत्रावेगळा ' या कादंबरीचे वैशिष्ट्य आगळेच आहे. या कादंबरीच्या प्रस्तावनेत इनामदार उघडउघड समाजहितविरोधी विचार मांडतात, व ते पटविण्यासाठी म्हणूनच की काय, पुढे बाजीरावाच्या 'दुर्दैवी' जीवनाचे आपल्या साहित्यिक प्रतिभेला राबवून चित्रण करतात. त्यांच्या प्रस्तावनेची, म्हणूनच छाननी करणे आवश्यक आहे. आपली तात्त्विक व वैचारिक भूमिका मांडताना या निबंधात त्यांना साधी तर्कविसंगती टाळता आली नाही. पान २ वर ते म्हणतात, " अखेरच्या क्षणापर्यंत

बाजीरावाच्या हातात एवढी सत्ता होती, पेशवा या शब्दात एवढी जादू होती की, तो वनवास न पत्करता तर पुन्हा दक्षिणेचे पठार रक्ताने भिजणे अशक्य नव्हते. सामान्य प्रजेची ससेहोलपट पुन्हा होणे अशक्य नव्हते." आणि पुढे पान ३१ वर ते म्हणतात– "... (इंग्रजी प्रचार) हा रेशमी फास आहे. खिलाडू वृत्ती त्यापैकीच.... जितांना कसली आली आहे खिलाडू वृत्ती ? त्यांनी पेटून उठले पाहिजे ! जेता दिसला की खाऊ का गिळू केले पाहिजे !" मग ते केले नाही म्हणून लेखक पुणेकरांची संभावना का करत नाहीत ? ससेहोलपट टळली असा सुटकेचा श्वास का टाकतात ? दक्षिण पठार रक्ताने भिजवले नाही म्हणून पेशव्याला बोल का लावत नाहीत ? तर कसेही करून बाजीरावाचा बचाव करावयाचा म्हणून.

अशा प्रकारच्या लघुप्रबंधामध्ये एखाद्या पुस्तकातील उतारा उद्धृत करताना, तो पडताळून पहाण्यासाठी मूळ आधार तपशिलाने देण्याचा प्रघात आहे. तो इनामदारांनी पूर्णपणे टाळला आहे.

ते स्वतःच असे सांगतात, "अस्सल नोंद (मूळ कागदपत्र) पाहिली रे पाहिली की, त्यातून लगेच काही निष्कर्ष काढणे धोक्याचे आहे."(पान ६) म्हणनच पटवर्धन–पेशवे भांडणाच्या पार्श्वभूमीमुळे पटवर्धन दफ्तरातील दुसऱ्या बाजीरावावरील दोषारोप अग्राह्य ठरतात, असा त्यांचा दावा. पेशवे दफ्तरातील कागदपत्रावरून ते बाजीरावाचे गुण सिद्ध करतात. "हे कागद एकांगी असण्याची शक्यता कमी आहे." असेही म्हणतात. (पान ६) याला काय आधार ? उलट 'झेप' कादंबरीतच असा उल्लेख येतो की, त्र्यंबकजी, पेशव्यांना मोठा खजिना वापरावयास मागतो व 'हिशोब खोटे लिहावेत,' 'बायांना बक्षिशी दिली' म्हणावे असे सांगतो. म्हणजे हिशेब, कागदपत्र व प्रत्यक्ष व्यवहार यात फार घालमेल असणे शक्य दिसते. पण इनामदार ते सोइस्करपणे विसरतात. नाही तर दुसऱ्या बाजीरावाचे गुण कसे सिद्ध होणार ?

कमालीची चुकीची इतिहासमीमांसा हा या प्रस्तावनेचा सर्वात मोठा दोष आहे. "पाश्चिमात्य संस्कृतीच्या मानाने आमची संस्कृती फार मागासलेली होती, हे आमच्या राज्यनाशाचे कारण आहे." (पान ३२) हे आधुनिक काळातील विचारवंतांचे म्हणणे त्यांना मान्य नाही. इंग्रज जेव्हा महाराष्ट्रात आले व त्यांनी येथील राज्यसत्ता नष्ट केली, तेव्हा मराठी राज्याची व सर्वसाधारणपणे महाराष्ट्रातील समाजाची काय परिस्थिती होती हे पाहिल्यास, इनामदारांचा या कारणमीमांसेवरील राग किती अयोग्य आहे हे समजेल. त्या काळातील मराठी समाज सर्व क्षेत्रात मागासलेला होता. बहुसंख्य लोक अन्यायाखाली दबले गेलें होते. त्यांची आर्थिक परिस्थिती खालावलेली होती. समाज विषमतेने पोखरलेला होता. अंधश्रद्धा व अमानुष चालीरीतींचा पगडा ब्राह्मणांपासून अस्पृश्यांपर्यंत सर्वांवर होता. लोक दैववादाच्या आहारी गेले होते. "राज्य बुडते खरे पण श्रीमंतांचे (पेशव्यांचे)

दैवच तसे आहे." (पान ६, विष्णू कृष्ण चिपळूणकर, काल आणि कर्तृत्व. ले. माडखोलकर.) या अवसानघातकी भावनेची अवकळा सर्व समाजावर पसरलेली होती. मराठ्यांच्या राज्यनीतीमध्ये कितीतरी वैगुण्ये होती. त्यांचा हुशारीने फायदा घेऊन इंग्रजांनी आपले बस्तान बसविले. सरदारांच्यात एकमेकात हेवेदावे पराकोटीला गेले होते. मराठी राज्याच्या रक्षणार्थ एकत्र यावे हा विचारच त्यांना शिवत नव्हता. खुद्द पेशव्यांच्या राजधानीत इंग्रजांचा विजय व्हावा, म्हणून अनुष्ठाने चालू होती. रास्ते सरदारांचा आश्रित "भाटचे एल्फिन्स्टनला अर्ज करतो... साहेब यास एश येवून राज्याचे कामकाज व्हावे, साहेब लोक जिवानिशी खुशाल रहावे, ब्राह्मण तपस्वी जागोजाग अनुष्ठानास बसले आहेत. ब्राह्मणभोजन पाच लक्ष व्हावयाचे आहे. येणेप्रमाणे बहुत प्रयत्न केला आहे. साहेब कृपावंत होऊन आज्ञा व्हावी, व बक्षिसाबद्दल दोन लक्ष रुपये कराराप्रमाणे द्यावे."(पान ९, वरील पुस्तक) यावरून फितुरी व राजद्रोह या गोष्टी कोणत्या थराला गेल्या होत्या व समाजहिताकडे सर्वजण किती दुर्लक्ष करत होते याची कल्पना येईल. समाजात संघटनेचा अभाव पूर्णपणे दिसून येत होता. विज्ञानातील प्रगती शून्य होती. की जिच्यामुळे शस्त्रास्त्रांची निर्मिती होऊ शकते. त्यामुळे मराठ्यांची शस्त्रास्त्रे मध्ययुगीन होती. समाजविचार मध्ययुगीन होता. वैयक्तिक व सामाजिक कर्तृत्व लयाला गेले होते. या अप्रगत समाजाविरुद्ध विज्ञानात प्रगती करून घेतलेला, वैज्ञानिक दृष्टी असलेला, सुसंघटित इंग्रज उभा ठाकल्यावर सहाजिकच मराठी समाजास हार खावी लागली. इंग्रजांची संस्कृती उच्च होती याचा अर्थ काय तर, त्यांची युद्धनीती, राज्यनीती, संघटन, विचार, दृष्टिकोन हे महाराष्ट्रातील तत्कालीन समाजापेक्षा उच्च पातळीचे होते. "...वाफेच्या इंजिनाचा शोध लागण्यापूर्वी भौतिक सुधारणाबाबत... (आम्ही बरोबरच होतो)...त्यानंतर आम्ही प्रगती करण्याचा प्रश्नच नव्हता. गुलामगिरीने आमचे हातपाय घट्ट बांधून टाकले होते." (पान ३२) असा इनामदारांचा युक्तिवाद. पण आम्ही गुलामगिरीत का होतो याचा विचार ते करीत नाहीत. गुलामगिरीचेच कारण आमची अप्रगत स्थिती, हे लक्षात घ्यायला हवे. "पुस्तके लिहवून घेणे, छापखाने चालवणे, नकाशे काढणे, विलायतेची सफर मारून येणे असल्या वालिश कारणांची राज्यविनाशाच्या कारणाशी जोड केली म्हणजे माणूस हसण्याशिवाय काय करणार?" (पान ३३) इनामदारांना हे सांगायला हवे की, वरील सर्व गोष्टी इंग्रज करीत होते याचा अर्थ, ते सुधारलेले होते, विज्ञानात त्यांनी फार प्रगती करून घेतली होती व नवीन विचारसरणी अंगिकारली होती. याला वालिश म्हणून इनामदारांनी स्वतःची मध्ययुगीन विचारसरणी उघडी पाडली आहे.

"शिवाजी महाराजांनी मराठी राज्य स्थापले त्या वेळीही विधवाविवाह होत नव्हते, वालविवाह होतच होते, पुस्तके नव्हती, छापखाने नव्हते, इतकेच नव्हे तर,

पुढे जे तोफांचे कारखाने मराठी सत्तेने काढले त्याचा मागमूसही नव्हता. तरीही एका समर्थ सत्तेशी टक्कर देऊन त्यांनी स्वतंत्र राज्य निर्माण केले." (पान ३३) या ठिकाणी शिवाजीचे कर्तृत्व व त्यावेळच्या समाजाची नवी दृष्टी यांचा विसर पडला आहे. शिवाजीने राज्य स्थापण्यास, टिकवण्यास, समाजास एकत्र बांधण्यास, त्यांच्यात पराक्रम निर्माण करण्यास आवश्यक असलेली दृष्टी दिली होती. ती हिंदवी स्वराज्याची कल्पना. त्याने मोगलांशी लढण्यासाठी वापरलेली गनिमी काव्याची पद्धती, त्याचे असामान्य नेतृत्व, त्याने केलेल्या सुधारणा या सर्व गोष्टी महत्त्वाच्या ठरल्या. शिवाय इंग्रजांशी तुलना करता मोगल संस्कृतीने हिणकसच.

एखाद्या समाजाचे सामर्थ्य, जीवनाच्या विविध अंगांमध्ये फुलणाऱ्या कर्तृत्वा-मधून निर्माण होत असते. आणि जिवंत व रसरशीत विचार हेच या सर्व कर्तृत्वाचे अधिष्ठान असतात. म्हणून त्या समाजामध्ये प्रसृत असलेल्या विचाराची प्रगल्भता आणि त्या समाजाची ताकद यांचा फार निकटचा अन्योन्य संबंध असतो. याच न्यायाने असे म्हणता येईल की, बालविवाह विरोध, विधवाविवाह पुरस्कार, ही त्या समाजातील विचारवंतांनी, स्त्री-पुरुष समानता, बहुसंख्य व्यक्तींचे सुख, एखाद्या रूढीची सामाजिक हिताहितकारकता याविषयी मंथन केल्याची द्योतक आहेत. यातूनच समाजजीवन डबक्यासारखे न रहाता प्रवाही, जिवंत व समर्थ बनत असते. या उलट जेथे बालविवाह आहे तो समाज अप्रगत व जेथे नाही तो प्रगत, असे ठोकळेबाज समीकरण मांडल्याचा चुकीचा आरोप इनामदार सुधारक विचारवंतांवर करतात.

समाजसुधारकांपैकी लोकहितवादींवर श्री. इनामदारांचा विशेष दात आहे. ते म्हणतात, " लोकहितवादींनी समाजाचा जो पद्धतशीर घात केला, त्या पापाबद्दल मला एवढंच म्हणायचं आहे की लोकहितवादी झाले नसते तर भारतीय स्वातंत्र्य १०० वर्षे अगोदर आले असते." (मंत्रावेगळा, पान २८)

लोकहितवादींनी केलेल्या भेदक स्वसमाज-टीकेमुळे महाराष्ट्राचा तेजोभंग झाला. तसेच बाजीरावाबद्दल जनमानसात सध्या प्रचलित असलेल्या विकृत कल्पनेचा खरा उगम त्यांच्या लेखनात आहे, असे इनामदार म्हणतात. (पान २८-२९) तसेच गोऱ्या धन्याचे पाय चाटण्याचाही आरोप त्यांच्यावर करतात ( पान ३१)

इनामदारांचेही निष्कर्ष संपूर्णपणे चुकीचे आहेत ही गोष्ट शतपत्रांकडे नजर टाकल्यावर लगेच लक्षात येते.

पहिली गोष्ट १०० वर्षे आधी म्हणजे १८४७ च्या सुमारास स्वातंत्र्य मिळण्याच्या आड १८४८ पासून वृत्तपत्रलेखनास सुरुवात करणारे लोकहितवादी कसे आले हे उमजत नाही. शब्दशः घेतल्यास ते विधान चक्क वेडगळपणाचे वाटते.

शतपत्रांतून स्वदेशप्रीती निःसंशयपणे दिसते. 'धर्मसुधारणा' या पत्रात ते सुचवतात, "स्वदेशाची प्रीती व त्याचे कल्याण विशेषेकरून मनात वागवावे." ते पत्र नं. ७८

मध्ये म्हणतात, "लोक शहाणे झाले म्हणजे हळूच इंग्रजाजवळ म्हणतील की आम्हास तुमच्या देशात आहे तसे पार्लमेंट द्या... पार्लमट व स्वराज्य भोगतील...परंतु ज्या काळी इंग्रज गडबड करू लागतील किंवा काही नवीन कानू करावयाचा आग्रह करतील, त्या काळी अमेरिकेत झाले तसे होऊन हे लोक आपल्यास स्वतंत्र करून घेतील आणि इंग्रजास सांगतील की तुम्ही आपले देशास जावे. यास दोनशे वर्षे तरी पाहिजेत. परंतु असे होईल यात संशय नाही." अमेरिकेप्रमाणे क्रांती करण्याचा उपदेश हा इंग्रजांचे पाय चाटण्याचा प्रकार आहे काय ? स्वातंत्र्य मिळण्याच्या काळाचा अंदाज चुकला असा फार तर ठपका त्यांच्यावर ठेवता येईल. परंतु त्यांचे द्रष्टेपण नाकारता येणार नाही.

पत्र नं. ६० पहा. " इंग्रजांचे देशचे सामान बंद करावे. किंबहुना आपले सामान त्यास द्यावे. परंतु त्याचे आपण घेऊ नये. जो इकडे उत्पन्न होईल तितका माल घ्यावा. विलायती कापड घेऊ नये. यास्तव आपल्यास जाडी मोठी कापडे नेसावयास लागली तर काय चिंता आहे ? परंतु आपले देशाचे रक्षण करावे." हा स्वदेशी व बहिष्काराचा तेजस्वी विचार, तसेच वर नोंदलेले स्वातंत्र्यवादी विचार लोकहितवादींनी भारतात सर्वप्रथम मांडले.

त्यांनी याशिवाय खालील सुधारणांचा पुरस्कार केला :– जातीभेद, ब्राह्मणांचे वर्चस्व नष्ट करावे, स्त्री-पुरुष समानता, धर्मातील मूर्तिपूजा, कर्मकांडयांचे स्तोम कमी करावे. ज्यास पाहिजे तो त्याने रोजगार करावा. आचार, विचार स्वातंत्र्य-हक्काची जाणीव वाढवावी. आर्थिक समता. विद्यावृद्धी. उद्योग प्रियता.

त्यांच्या एकंदर प्रतिपादनाचा सारांश असा की, लोक सर्वार्थाने शहाणे झाल्याशिवाय इंग्रजराज्य जाणे, सुराज्य येणे व स्वास्थ्य येणे शक्य नाही. व लोक शहाणे होण्याकरिता इंग्रजांच्या साहचर्यापासून मोठाच लाभ होणार आहे. विलायतच्या सफरीचे महत्त्व याच संदर्भात आहे. [ सिंधुबंदी हे आपल्या मागासपणाचे एक मोठे कारण होते असे सावरकरांनी म्हटलेच आहे.] पण ही मीमांसा इनामदारांना ओळखता आली नाही.

आधुनिक महाराष्ट्रातील राजकीय आणि सामाजिक जीवनातील लोकहितवादींचे अनन्यसाधारण महत्त्व इनामदारांना उमजले नाही किंवा त्यानी ते उमजून न घेण्याचे ठरविले आहे.

इंग्रजांच्या विजयामागील सांस्कृतिक पुढारलेपणाची कारणमीमांसा व सुधारणेचा मार्ग इनामदारांना मान्य नाही. त्याला ते राष्ट्रघात म्हणतात. मग ते कोणते कारण देतात ? तर " मराठे लढाई का हरले...याला माझे उत्तर ' दुर्दैवाने ' हे आहे. तात्कालिक कारणे असतील. पण दुर्दैव हेच खरं कारण. (पान ३५) पत्र क्र. २४ मध्य लोकहितवादी त्यावेळच्या लोकांचे नेमके हेच विचार उद्धृत करतात. "आमचे लोक मूर्ख आहेत... ते म्हणतील की राज्य कशाने गेले, तर

सद्दी फिरली म्हणजे राज्य जाते. हे काळाचे माहात्म्य... सद्दी या शब्दाचा अर्थ पाहिला तर काही नाही. लोकांचा मूर्खपणा आहे." "या वेळच्या सामान्य लोकांमध्ये विद्वान म्हणणाऱ्या ब्राह्मणांमध्ये व शूर म्हणणाऱ्या सरदारांमध्ये प्रारब्धवाद माजला होता....त्याचा परिणाम असा झाला होता की, भावी अवतारी पुरुषाच्या आगमनाकडे डोळे लावून व मागील वैभव आठवून आळसात, चैनीत व अनीतीत दिवस काढावे अशी वृत्ती सर्वत्र बोकाळली होती. हा प्रारब्धवाद व अवतारवाद नष्ट करून लोकांना प्रयत्नवादी बनवावे हा लोकहितवादींच्या सर्व लिखाणाचा रोख होता." (आधुनिक भारत, दुसरी आवृत्ती, पान ९४) तरीही १८४९ सालच्या सुमारास पुण्यात असे विचार असणे व लोकहितवादींना विरोध होणे आपण समजू शकतो. पण १९६९ साली आधुनिक महाराष्ट्रातील एका प्रथितयश लेखकाला व इतिहासाच्या अभ्यासकाला त्यांचे मर्म समजू नये यासारखे दुर्दैव (!) ते कोणते ? कृतिशील मनाची झेप आणि प्रयत्नवाद यांना खुरटवणाऱ्या या विचाराला थारा मिळता कामा नये.

श्री. इनामदारांच्या विचारसरणीचा एवढा समाचार पुरे आहे.

सारांशाने असे म्हणता येईल की, आजच्या ऐतिहासिक कादंबऱ्या इतिहासाविषयीचे विश्वसनीय, सुजाण ग्रंथ म्हणण्यास अपात्र आहेत, तरुणांना स्फूर्तिदायक होण्याच्या दृष्टीने अयोग्य आहेत. त्यांच्यातून बव्हंशी समाजास अहितकारक विचार प्रसवले जात आहेत. त्यांचा संभाव्य वाईट परिणाम टाळण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.

ही त्यातलीच एक धडपड आहे.

¤ ¤ ¤



अशोक साळवी

# उगीच

बाहेर केव्हापासूनच अंधाराचं साम्राज्य पसरलेलं असतं. उघड्या खिडकीतून थंड वाऱ्याच्या झुळूकेबरोबरच कुठेतरी लागलेल्या हिंदी सिनेमातल्या गाण्याचे सूर पण आत येत असतात. रस्त्यावरील दिव्याची पिवळसर प्रकाशकिरणं खिडकीतून आत येऊन जमिनीवर पडलेली असतात. रात्रीचे आठ वाजले तरी मी मात्र अजून खोलीतील दिवा लावलेला नसतो. प्रकाश नकोच वाटत असतो, नाहीतर जवळचं बटण दाबायला वेळ लागला नसता. कितीतरी वेळ मी तसाच सुन्न मन:स्थितीत खाटेवर बसून राहिलेला असतो. बाहेरच्या काळोखात डोळे विस्फारून काहीतरी शोधीत असतो, पण अथांग जलाशयात आपण गटंगळ्या खात आहोत याची जाणीव होतच रहाते. मन जास्तच उदास होतं. डोक्यात विचारांची सणक उठते. मग मी तसाच तिरिमिरीत उठतो. खिडकीशी जाऊन उभा राहतो. तुरळक

दिसणाऱ्या इतर इमारतीच्या खिडक्यांतून मंद प्रकाशकिरणं बाहेर पडत पडत असतात. मघाचे ते गाण्याचे सूर अधिकच स्पष्ट झालेले असतात. खांबावरील दिव्याभोवती असंख्य पाखरांनी फेर धरलेला असतो, अन् माझ्या मनात असंख्य विचारांनी थैमान घातलेले असते. त्या विचाराच्या गर्तेत मी नकळत बाहेरच्या काळोखाकडे आकर्षिला जातो–

कपडे चढवून मी तसाच लॉजच्या बाहेर पडतो. असंख्य विचारांच्या लाटांवर तरंगतच त्या 'वेण्णानगर' मधून मी बाहेर पडतो. पायाखाली छोटासा पण डांबरी रस्ता असतो. पूर्वी याच ठिकाणी साधी पाऊलवाट होती. काळोखाला अंगावर घेत मी तसाच विचारात रस्ता तुडवितो. नगराच्या बाहेर आल्यावर पहिल्यांदाच आकाशाकडे नजर जाते. काळ्या मेघांनी वर नक्षत्रांना लपविलेले असते. त्यामुळे नेहमीपेक्षा अधिकच अंधार भासत असतो. पण हळूहळू डोळे अंधाराला सरावतात. भोवतालचा अस्पष्ट भाग बराचसा स्पष्ट होतो. एकेकाळी तो सर्वच भाग मी पायाखाली तुडविलेला असतो. आता फक्त त्याठिकाणी पूर्वीच्या जुन्या घराऐवजी दुसरी, नवी, ऐटबाज घरे उभी असतात. ज्या ओढ्यांना पूर आला की पाणी ओसरेपर्यंत पार करता यायचा नाही, त्यावर आता नवे पूल उभे असतात. ज्या ठिकाणी एकेकाळी मस्त पिके डौलाने उभी असायची, त्याच ठिकाणी आता धरणं बांधण्याकरिता लागणारी साधने इतस्ततः पसरलेली असतात. सर्वच बदललेलं असतं. माझं जीवन ? ते सुद्धा वेगळ्याच वाटेवरून धावत असतं !

ठराविक चिंचेची झाडे आली की मी नकळत चाल मंदावतो. ही तीन चिंचेची झाडे ! लहानपणी या झाडांवर अन् आसपास खेळण्यातच सबंध दिवस जाई माझा. काळोखातून सैरभैर फिरणाऱ्या नजरेला ही चिंचेची झाडे दिसल्यानंतर मनात उठलेल्या आठवणींच्या कारंज्यामुळे काहीतरी ओळखीचं सापडल्यासारखं होतं. मी मग तिथल्या त्या मधल्या झाडाखालीच बैठक मारतो. पाय लांब करून अन् हात जमिनीवर टेकून विसावल्यासारखा बसून रहातो. समोरच एक बंगलीवजा घर असतं अंधारात बुडालेलं. चाहूल कुणाचीच नसते. मी तसाच एकटक त्या घराकडे पहात रहातो. हळूहळू अंधारात बुडालेले त्याचे सर्व भाग मला दिसायला लागतात, पण फक्त क्षणकालच ! त्यानंतर त्याच ठिकाणी दुसऱ्याच एका घराची आकृती मला दिसू लागते. या नव्या घरापेक्षाही, ते अस्तित्वात नसलेले घरच मला जास्त स्पष्ट दिसू लागते ! वरची तांबडी लाल कौले, मातीच्या भिंती, मागील दारचा तो आड अन् तुळशी वृंदावन. त्याच्याच शेजारी घोसाळ्याचा वेल अन् त्यासाठी केलेला मांडव ! अगदी थेट चार वर्षापूर्वीचं चित्रं माझ्या डोळ्यासमोर उभे रहाते.

चार वर्षापूर्वी या समोरच्या घराऐवजी माझं घर होतं तिथं. खेड्यातलं घर. साधे विटा–मातीचेच, पण त्याला घरपण होतं. घरात आई होती. दादा होते अन् छोटी बहीण रंजना पण होती. हो होती ! आता नाहीयत ती कोणीच. एकटा आहे

मी. अगदी एकटा ! म्हणून तर असा भुतासारखा येऊन या चिंचेच्या झाडाखाली बसतो कधीमधी !

बालपणापासूनच मला आई–दादांचा ळळा फार. कॉलेजात असताना त्यांना सोडून जाताना कोण रडायचो मी. त्यांची आठवण झाली की काही सुचेनासे व्हायचे. आईला ते सांगितले तर म्हणाली होती, " अरे, आमच्या आठवणी म्हणजे तुला प्रेरणा ठरल्या पाहिजेत ! " त्यांच्या शक्तीबाहेरचे शिक्षण ते मला देत होते, त्यामुळे खूप अभिमान वाटायचा मला. त्यांच्या सुखाचे बेत रचण्यात कितीतरी वेळा मी मश्गुल होत असे !

एके दिवशी मित्राशी अशाच गप्पा मारल्या होत्या. त्याला फक्त आईच होती. अन् माझ्याइतका जवळचा मित्र त्याला कोणीच नव्हता. आईची आठवण झाली की, तो माझ्याकडेच येऊन बसायचा. वडील नाहीयत् म्हणून अश्रू गाळायचा. मग मी त्याला, मला वडिल लहानपणी कसे गोष्टी सांगायचे हे ऐकवायचो. तो कान देऊन ऐकायचा. अन् संतुष्ट व्हायचा. त्याचे मला आश्चर्य वाटायचे !

–त्याच रात्री मला एक सुंदरसे स्वप्न पडले. मी सुट्टीवर घरी चाललो होतो. रंजनासाठी भरपूर खाऊ घेतला होता. मी बसमधून उतरलो की तिने मला मिठी मारलीच म्हणून समजावी. पण आज इकडे तिकडे पाहून सुद्धा ती कुठे दिसत नव्हती...

...मी तिला हाक मारणार इतक्यात मी जागा झालो. शरिराला झोके बसतायतस् वाटायला लागलं. वाटलं अजून बस्चा परिणाम गेलेला दिसत नाही. बसचा खडखडाटसुद्धा अजून ऐकू येत होता. पण बस दूर निघून गेली, तरी तो आवाज कसा ऐकू येत होता हे मला समजत नव्हते. मी संभ्रमात पडलो. पण क्षणभरच !



कारण लगेच भोवताली गोंधळ माजलेला ऐकू यायला लागला. पळण्याचे अन् उघड- लेल्या दारांचे आवाज थडाथड कानावर यायला लागले. जाता जाता माझ्या खोलीच्या दारावरही कोणीतरी धक्का देऊन गेलं. पाठोपाठ आरोळ्या ऐकू आल्या–

" भूकंप... भूकंप..."

मग तसाच धावत सुटलो. होस्टेलचे चार जिने उतरून खाली आलो, तरी खालची जमीन हादरतच होती. वस्तुस्थितीची कल्पना आली होती. पोटात भीतीचा गोळा उठला होता. अन् तशात त्या स्वप्नाची आठवण झाली ! मस्तकात भयंकर कळ उठली. गावीही असाच झाला असेल का भूकंप ? मातीचे घर कितीसं तग धरील ? की रंजना स्वप्नात काही सांगून गेली ?...

पहाटेच सर्वत्र झालेल्या भूकंपाचे वृत्त समजले अन् लगेच घरचा रस्ता पकडला. येणार म्हणून कळविले नव्हते, त्यामुळे स्टँडवर रंजना असणे शक्यच नव्हते. गाडीतून उतरल्यावरच कोणीतरी कानात कढत तेल ओतले...

" घर साफ झालंय अगदी !"

तसाच तीरासारखा धावलो घराकडे. आजूबाजूची पडकी घरे पाहून पोटात धस्स होत होते. घरांजवळ आलो अन् गाभण गाय ढिली पडल्याची जाणीव झाली. पाय जागच्या जागीच थबकले. घराचे सर्वच्या सर्व छप्पर खाली कोसळले होते. विटा-मातीचा पसारा कितीतरी लांब पसरला होता. दगडी पाया मात्र तसाच शिल्लक होता. उभा होतो तिथेच आसपासचे लोक जमा झाले. कोणीतरी म्हणत होते–

" रंजनाने आईच्या गळ्याला मिठी मारली होती !"

" दादांचा चेहरा ओळखू सुद्धा येत नव्हता !"

– मला पुढचे शब्द ऐकूच आले नाहीत !

त्यानंतर तोंडावर आलेली परीक्षा तशीच गेली. सहा महिने मामांकडे राहिलो. अभ्यासातून मन उडाले होते. पण मामांनी मागे लागून परीक्षेला बसविले. पहिल्यांदा नापास झालो. पास झालो त्यावेळी धाय मोकलून रडलो ! पहिल्यांदा नोकरीवर रूजू झालो त्यावेळी पण. आता मामांनी आणलेल्या मुलीबरोबर गेली दोन वर्षे संसार चालला आहे....

अगदी सुरुवातीलाच नवीन बिऱ्हाड थाटले. ती अन् मी. मनाला थोडा आधार सापडला. नवी वाट मिळाल्याच्या आनंदात मश्गुल झालो. पण तो आनंद फार काळ टिकला नाही. तिला भेटायला येणारे तिचे आई-वडील आता जास्त जास्तच आमच्याकडे तळ देऊ लागले. सुरुवातीला बरं वाटलं. मनाला विसावा वाटायचा, पण पुढं पुढं त्यांच्या अस्तित्वानं मनावरची जुनी खपली पुन्हा पुन्हा निघू लागली. माझे आई-दादा असते तर आता ते हक्कानं राहिले असते या घरात !


मी वैतागलो होतो. तसं तिच्याजवळ एकदोनदा स्पष्ट बोललो पण होतो. पण

# आवडती

# भेट

## त्यांना फोटोग्राफीचा ओनामा गिरविण्यासाठी

Agfa क्लिक III




CMAG-119-MR

आपल्या मुलांना फोटोग्राफीच्या मनोरंजक विश्वाचा परिचय करून द्या. त्यांना क्लिक III घेऊन द्या. त्याच्या साह्याने फोटो काढणं अगदीं सोपं आहे. गणित करायला नको किंवा इतर जुळवाजुळव नको. फक्त दृश्याचा नेम धरायचा नि बटण दाबायचे. सुरुवातीपासूनच याचे आश्चर्यकारक परिणाम पहा. शिवाय एका रोलमध्यें १२ सुंदर सुंदर चित्रे.

यंदा सणासुदीच्या दिवसात आपल्या मुलांना सुरेख क्लिक III भेट द्या. फोटोग्राफीचा ओनामा गिरविण्यासाठी तो एक अत्युत्तम कॅमेरा आहे.

सर्व अधिकृत आगफा विक्रेत्यांकडे मिळतो.



AGI आगफाच्या देखरेखीखाली बनविणार:
दि न्यू इंडिया इन्डस्ट्रीज लिमिटेड, बडोदे

एकमेव वितरक:

**आगफा गेवर्ट इंडिया लिमिटेड**

मुंबई · नवी दिल्ली · कलकत्ता · मद्रास

त्याचा परिणाम आमच्या दोघांच्या भांडणातच झाला. मनाची जुनी जखम वहात होतो अन् नवीन जखमा होतच राहिल्या....

त्यांना माझ्या मनाची व्यथा समजावून सांगणे फार अवघड होते. तुमच्या उपस्थितीमुळे माझ्या आई-दादांची मला फार आठवण येते हे सांगायचं कसं ? विचार खूप केला, पण उपाय सापडत नव्हता. तेव्हढ्यात मामांना पेन्शन मिळाली अन् मला काहीतरी धागा हातात आल्यासारखे वाटले....त्यांना सरळ माझ्याकडे घेऊन आलो !

मामा-मामी आले अन् आपोआपच तिच्या आईवडिलांनी काढता पाय घेतला. मामा-मामी अपार प्रेम करतात माझ्यावर – लहानपणापासूनच ! पण तरीसुद्धा माझ्या मनाची एकदा झालेली जखम बरी होत नव्हती. मामा-मामी अन् आई–दादा ! मन नेहमीच तुलना करीत राहिलं. प्रत्येकवेळी आई-दादांचच पारडं जड व्हायचं. प्रत्येक बाबतीत काहीतरी उणीव भासायची अन् मन जास्तच तडकत राहायचं. मामी माझ्या आवडीचं खूप खायला करून घालतात. पण वाटतं यात आईच्या हातची चव नाही ! त्यांचं दर्शन घेतेवेळी त्या काहीतरी पुटपुटतात तोंडानं, पण आईनं, "अरे, देवाचं दर्शन घेतलंस का अगोदर ?" असं विचारण्यातील सुद्धा ओलावा नसल्याचं भासतं. दादांना दररोज देवपूजेला पूरा एक तास लागायचा – इथे पूजा मुळी मामीच करतात–मुक्यानं ! रात्री ज्ञानेश्वरीच्या ओव्या गुणगुणल्याशिवाय दादा अंथरुणाला पाठ टेकीत नसत. मामांना इथे देवाचं अस्तित्वच मान्य नाही ! ते नेहमीच कसलेतरी जाडे-जुडे ग्रंथ वाचण्यात दंग असतात. त्यांच्याबरोबर खूप वेळा चर्चा पण रंगते, पण महाभारतातील ओव्यांचे अर्थ समजावून सांगताना रंगून गेलेले दादाच मला जास्त तीव्रतेने आठवतात !...एक ना दोन ! अन् रंजना...तिनं तर फार मोठी पोकळी निर्माण केलेली आहे मनात.

असं असह्य झालं तेव्हा एक दिवस पुण्याला काम आहे म्हणून बाहेर पडलो अन् सरळ वेण्णानगरचा रस्ता धरला. पूर्वी याचच नाव वेण्णा होतं...माझं गाव ते ! मध्यंतरीच्या काळात वेण्णेला धरण झालं अन् तिथलं सर्व गावाचं अस्तित्व नष्ट झालं. पूर्वीच्या घरांच्या ऐवजी नवीन सरकारी घरे अस्तित्वात आली. पूर्वीच्या माझ्या तिथल्या जागेची पण मामांनी काहीतरी विल्हेवाट लावली होती. त्याच ठिकाणी आता एक टुमदार बंगला उभा होता. बाकीचं अस्तित्व असंच नाविन्यात गडप झालेलं असतं. तिथल्याच एका लॉजमध्ये मी उतरतो अन् तिथल्या प्रत्येक ओळखीच्या जागी फिरत रहतो. खरं म्हणजे तिथला खडा-न्-खडा माझ्या परिचयाचा असतो. पण 'वेण्णा' ऐवजी 'वेण्णानगर' आता उभं असतं अन् त्यानंच कित्येक दाट परिचयाच्या जागासुद्धा साफ बदललेल्या असतात. परंतु जेवढं म्हणून मला पूर्वीचं तिथ आढळतं तेव्हढ्यानंच माझं मन हलकं होऊन जातं !

त्या दिवसापासून अधून मधून नेहमीच मी इकडे येतो. संध्याकाळपर्यंत कुठं तरी

भटकत रहातो. पण संध्याकाळ झाली की नकळत पावलं या माझ्या-पूर्वीच्या घराच्या जागेकडे वळतात. अंधारात असा एकटाच मी या झाडाखाली बसतो. मनःचक्षूसमोर माझं ते मातीचं घर उभं रहातं अन् त्यावेळच्या 'मला' मी कल्पनेतूनच पहात रहातो.—

...मी बसमधून उतरलेला असतो. अन् रंजनाची मिठी कमरेभोवती पडलेली असते. ती मला 'वाजत-गाजत' घरी आणते. दारात आलेल्या आईचं मी दर्शन घेतो....

...खाऊ काढायच्या अगोदर मी म्हणत असतो,

"आई, ही रंजना इतकी काळी कशी ग?"

"तिला अर्ध्या भाकरीवर घेतलिय् भिकाऱ्याकडून!"

"हा! तरीच हं!"

"जा तिकडं!" रंजू फुरगटते!

मग मी जाऊन तिचा गोड चेहरा हातात घेतो. हळूच एक पेढा तिच्या तोंडात सरकवितो....अन् पुढच्याच क्षणी ती गळयात पडलेली असते!

संध्याकाळी आई नेमानं दृष्ट काढते. अन् तितक्याच नेमाने त्या पायरीवर बसून मला रंजनाला गोष्ट ऐकवावी लागते. ऐकता-ऐकताच बिलगून ती झोपी जाते!

...एक ना दोन! इथं येऊन बसलं की असा हा काळाचा अडसर दूर सारला जातो. आठवणींचा पेव फुटून त्यांतून एकसारख्या आठवणी वहात राहातात. त्या आठवणींच्या सहाय्याने भूतकाळात मनमुराद भटकून येतं! घरी असलं की, मामा-मामी, आई-दादांच्या अनुपस्थितीची जाणीव करून देतात अन् इथे...इथे आई-दादा-रंजना नसतानासुद्धा त्यांच्याबरोबर काही काळ घालविल्याचं समाधान मनाला मिळतं!

□ □ □


पुरंदऱ्यांची दौलत

श्रीमंत बाजीराव पेशवे / तुळशीबागवाला / खासा फिरंगी मारिला / जिद्द / खासगीवाला / खंडेराव दरेकर / तलवारीचे पाते / पालखी / पुरंदऱ्यांची दौलत

नऊ पेशवेकालीन कथा

ब. मो. पुरंदरे

किमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

# वर आभाळ बाकी बर्फ



आनन्द चान्देकर

लेखांक तीन

## २६ मे । । । १९६६ । । ।

सकाळ. हवा फार थंड आहे. जमिनीवर व आसपाच्या उतारांवर बर्फ आहे. सर्व पांढरे दिसत आहे. आकाश अजून ढगाळलेलेच आहे. बर्फाचे लहान लहान कण हवेत तरंगत खाली जमिनीवर येतात. वातावरण निराशाजनक आहे. तंबू सर्व ओले आहेत. आम्ही ते काढतो. ते नीट गुंडाळून बांधणे त्रासाचे आहे. पण ते करायलाच हवे. आम्ही निघण्याच्या तयारीत आहोत. पण वातावरण निवळेपर्यंत आम्हाला थांबले पाहिजे. दुप्पट चालून देवडी गाठण्याची कल्पना अंधुक होत आहे. "दिवस चढेल तशी हवा पण निवळेल," लोपसांग म्हणतो. आता निघावे असे आम्ही ठरवितो; पण आम्हाला एक मोठा धक्का बसतो. नेपाळी लोक आमच्याबरोबर यावयाचे नाकारतात. लता गावातील ६ माणसांपैकी ५ माणसे आम्हाला काही एक न सांगता निघून गेली आहेत. राहिलेला एक यायला तयार नाही. लोपसांग नेपाळी लोकांच्या कॅम्पकडे धाव घेतो. तो त्यांना समजावण्याचा प्रयत्न करतो. पण काही उपयोग नाही. ते येण्याचे नाकारतात. "आम्ही आजारी आहोत, आम्हाला येता येणार नाही." हे त्यांचे पालुपद. त्यांच्यातला एक जण हमाल डोके धरून बसला आहे. इतर भाकऱ्या भाजीत आहेत. त्यांच्या प्रमुखाचे पण ते ऐकायला तयार नाहीत. मी व डॉक्टर तेथे जातो. डॉक्टर त्यांना औषध देतात. धरत व दोरजे पण आहेत. पण कशाचाही उपयोग होत नाही. आम्हाला परत यावे लागते. आमचे गढवाली हमाल हसतात. "ये नेपाळी कमजोर है. भाग जाते है. हमने कलही बताया था." ते म्हणतात.

आता आम्हाला पुन्हा काही बोजे येथे ठेवून पुढे जावे लागणार. पण आमचे हमाल या प्रसंगाला तोंड देण्यास तयार होतात. लोपसांगने त्यांना चांगले तयार

केले आहे. थोडयाच वेळात आम्ही समोरच्या मालाथुनी खिडीच्या दिशेने चढा-वयास सुरुवात करतो. फक्त ९ बोजे मागे राहिले आहेत.

हिमालयातले चढ कसे फसवे असतात, लांबून अगदी सोपे वाटतात. अगदी सोपी चढण वाटते; पण चढताना मात्र चढण उभी वाटते. लांबून लहान लहान दिसणारे खडक जवळ गेल्यावर प्रचंड असल्याचे दिसून येतात. हा सर्व येथील परिमाणाचा परिणाम आहे.

खिडीपर्यंत जेमतेम १००० फूटच चढावयाचे आहे. आता आम्हाला निघावयास उशीर झालेला आहे. दुप्पट चाल करण्याचा विचार सुद्धा करणे शक्य नाही. आज आम्हाला मालाथुनी खिडीच्या १५०० फूट खाली असलेल्या दिब्रूगेटा मैदानावरच मुक्काम करावा लागणार.

अरोरा व घरत सर्वांच्या पुढे आहेत. येथे पायवाट नाही. प्रत्येकजण स्वतःचा रस्ता काढीत वर चढत आहे. डोंगर दगडाळ आहे. थोडेसे गवत व थोडी लहान-लहान झुडुपे. माळी सर्वांच्या मागन डॉक्टरांबरोबर येत आहेत. मी खिडीत पोहोचतो. एवढयात लोपसांग मागून येऊन मला गाठतो. दुराशीपेक्षा ही खिड वेगळी आहे. १०००–१५०० यार्ड लांब अशा डोंगराच्या माथ्यावर आम्ही उभे आहोत. दोन्ही टोकाला उंच खडकाळ शिखरे. सह्याद्रीतील खिडीची कल्पना हिमालयात बदलावी लागते. खिड म्हणजे दोन उंच पर्वतांमध्ये असलेली खाच. ही कधी चिचोळी असते तर कधी या मालाथुनीसारखे मोकळी चाकळी असते. हवा आता जवळजवळ स्वच्छ आहे. बहुतेक ढग पळाले आहेत. आमच्या पाया-खाली १॥ ते २ हजार फूट खोल दरी आहे. तिच्या पलीकडे द्रोणगिरीची दक्षिणे-कडील भिंत आहे. त्यातलेच एक शिखर हनुमान, बरोबर आमच्या समोर आहे. ही त्याची पश्चिमेकडील बाजू आहे. त्याच्या शेजारीच दक्षिणेला आणखी एक १९२१० फूट उंचीचे शिखर आहे. त्याला आम्ही छोटा हनुमान म्हणतो. भिंतीच्या दक्षिण टोकावरून पलीकडे उंच आकाशात नंदादेवी दिसत आहे. देवीस्थानची शिखरे, बथारटोली हिमाल, रोंती आता अगदी जवळ दिसतात. भयानक व सुंदर अशी ऋषिगंगेची दरी आमच्या समोरच पसरलेली आहे. उभ्या कडयांवरील टांगती जंगले, नदीपर्यंत खचलेल्या land slides. अप्रतिम देखावा आहे. या प्रदेशातून रस्ता आहे हेच आश्चर्य आहे.

आम्ही हनुमानच्या पश्चिम भागाचे निरीक्षण करतो. आमच्या योजनेप्रमाणे पर्वताला वळसा घालून पूर्वेकडील बाजूने चढाई करावयाची आहे. लोपसांग पण माझ्या शेजारी उभा राहून निरीक्षण करीत आहे. "Why not attempt from this side? Why go round the mountain?" तो म्हणतो. "But is it possible?" मी विचारतो. आम्ही उभे असलेल्या जागेच्या डाव्या बाजूलाच जवळच बेस कॅम्पची जागा लोपसांग सुचवितो, व त्याच्या पुढे वर कसे जाता

येईल याची पण योजना सांगतो. " Shall I go ahead and have a look ?" अरोरा विचारतो व निघतो. पण मी त्याला थांबावयास सांगतो. माझ्या कल्पने-प्रमाणे ह्या बाजूने वर जाणे आमच्या तरी आवाक्याबाहेरचे आहे. एवढ्यात माळी पोहोचतात. मी त्यांना लोपसांगची कल्पना सांगतो. "पण इकडून जर वर पोहोचलो नाही तर विनाकारण आपला वेळ व सामुग्री मात्र फुकट जाईल," मी म्हटले. तोपर्यंत लोपसांग दुर्बिणीतून पहात आहे. तो आमच्याकडे वळून म्हणाला, " This is very difficult. There is danger of avalanches also. How is the other side on the map ? " शिक्षण नसल्या ने शेरपांना नकाशावरून प्रदेशाची कल्पना करता येत नाही. याबाबतीत त्यांना आमच्यावरच अवलंबून रहावे लागते. मी त्याला आम्ही ठरविलेला मार्ग नकाशावर दाखवितो. " नकाशाप्रमाणे पूर्वेकडील चढ सोपा असावा. " It is always like this. The western faces are steep. The eastern ridges are gradual. Let us follow the route to the east." तो म्हणतो.

लोपसांग व दोरजे आता त्यांच्या वातावरणात आहेत. चालण्या-बोलण्यात आत्मविश्वास आहे. लोपसांग फारसा शिकलेला नसला तरी इंग्रजी उत्तम बोलतो. उच्चार पण सफाईदार आहेत. साहेब लोकांबरोबर हिंडल्याचा परिणाम. आम्हा सर्वांशी वागण्यात आदर व आत्मीयता. मी नेहमीच 'बडा साब.' दोरजे पण तसाच आहे. फक्त त्याला इंग्लीश बोलता येत नाही. तो लाजाळू आहे. जवळ-जवळ बायकीच. स्वयंपाक करताना चुलीजवळ अगदी बरोबर एखाद्या बाईसारखा बसतो. बऱ्याच वेळा त्याच्या हालचाली पण त्यांच्यासारख्याच वाटतात. पण तो चांगलाच तगडा व काटक आहे. लोपसांगपेक्षा उंचनींच आहे.

आता १०–३० वाजले आहेत. आज आम्ही दिब्रूगेटापर्यंतच जाणार. दिब्रूगेटा-समोरच १५०० फूट खाली दिसत आहे. हे एक हनुमानच्या पश्चिमेकडील बाजूच्या पायथ्याच्या उतारावरील एक मैदान अगदी चित्रासारखे. भोवताली पाईन वृक्षांचे जंगल. त्याच्या मागे खडकांचे काळेकभिन्न कड्यावर कडे व त्यांच्याही वर वर्फाच्छादित पर्वतशिखरे. मैदानावर, पावसाळ्यात जेव्हा फुले फुलतात, तेव्हा तर फारच सुंदर दिसत असावे. फ्रँक स्माईद् का कोणी गिर्यारोहकाने त्याला ' The camping places of all camping places ' म्हटले आहे ते अगदी सार्थ आहे.

आम्ही उतरण्यास सुरुवात करतो. अगदी उभी उतरण आहे. उतरताना वारं-वार आम्हाला हातातल्या कुऱ्हाडीचा काठीप्रमाणे उपयोग करावा लागतो. काही हमाल आमच्या पुढे आहेत. या पहिल्या उतारावर स्लेटचे तुकडे पसरले आहेत. आमच्या उजव्या हाताला १०००–१५०० फूट उंच अगदी गुळगुळीत स्लेटच्याच

खडकाची भिंत आहे. त्या उतारानंतर आम्ही विश्रांतीसाठी बसलो आहोत. मीर-वार्नासिंग माझ्याजवळच आहे. तो आगपेटी मागतो व आपली गुडगुडी पेटवितो. घरत एक झरका घेतात. मला मात्र सिगारेटच बरी वाटते. आता बऱ्याचशा हमालांना आम्ही नावाने ओळखू लागलो आहोत. प्रत्येकाचे वेगळे व्यक्तिमत्त्व लक्षात येऊ लागले आहे. एकंदर फार चांगली माणसे आहेत. देखणी व काटक. एकदा अटी ठरल्यावर त्यांनी काम टाळले नाही. जड बोजांची तक्रार जरूर होई; पण शेवटी कोणीतरी ते बोजे उचलत असे. त्यांच्या शेकोटीजवळ आम्ही जाऊन बसत असू. आम्हाला तावडतोब स्वतःचे अंथरूण बसण्यास देण्याची त्यांना घाई होई.

आता एका लँड स्लाईडमधून जावयाचे आहे. नुसती माती व लहान-मोठे दगड. पाय ठेवताच माती व दगड घसरावयास सुरुवात होते. झपाझप पावले टाकीत, माती व दगडांबरोबर पावलांना घसरण्याची संधी न देता हा भाग ओलांडावा लागतो. आम्ही पलीकडील, खालच्या उतारावर दिसणाऱ्या पाईन वृक्षांच्या जंगलात शिरणार आहोत. अरोरा सर्वांच्या पुढे आहे. नंतर घरत, प्रकाश, व्यंकी, देसाई व सर्वात शेवटी मी व ओवळेकर. माळी व डॉक्टर मागे राहिले आहेत. आम्ही बाकीच्या सदस्यांनी बरोबर रहावयाचे ठरविले आहे.

आम्ही ती लँड स्लाईड ओलांडली. आता चांगली पायवाट आहे. जरा बसावे असे वाटते. पण अरोरा बराच पुढे गेला आहे. आम्ही त्याला ओरडून थांबावयास सांगतो. जरा वेळाने त्याला ऐकू जाते. तो थांबतो. जरा नाखुषीनेच का कोणास ठाऊक, अरोराला विश्रांती, आराम नको असतो. तो सर्व सुखसोयी टाळतो. सिगारेट ओढीत नाही, दारू पीत नाही. अन्न पण साधेच हवे. पण फार काटक आहे, बचत हा त्याचा परवलीचा शब्द आहे.

आम्ही थोडा वेळ बसतो. बिस्कीटे व लेमनड्रॉप्स. आमच्या खिशात २४ तास बिस्कीटे असतात. आता दिब्रुगेटा जवळ आले. खालचे जंगल पार करून मधला प्रवाह ओलांडायचा की आम्ही पलीकडे मैदानावर पोहोचू. हवा स्वच्छ आहे. ऊन पडले आहे. पण हवा मात्र थंड आहे. आता आम्हाला उठून चालू लागले पाहिजे. "Come on Arora lead." मी अरोराला म्हणतो, "No, you go ahead. I go too fast." तो म्हणतो. पण तो उठतो व पुढे चालू लागतो. आम्ही जंगलात शिरतो. आता वाटेवर पूर्ण सावली आहे. पायवाट अगदी सरळ खाली खाली जाणारी...आम्ही बाजूच्या झाडांचा आधार घेऊन उड्या मारीत, धावतच उतरतो. ही वाट कधी संपणारच नाही असे वाटते.

शेवटी ती वाट संपते. आम्ही हनुमान नाल्याच्या किनाऱ्यावर आहोत. दुपारचे १२ वाजले आहेत. पण ऊन जाणवत नाही. आम्ही त्या प्रवाहाचे संगीत ऐकत आरामात बसून रहातो. हिमालयातील अशा प्रवाहांच्या काठी त्यांचे संगीत ऐकत बसणे हा एक आगळाच अनुभव आहे. ते संगीत ऐकत तासन् तास अशा प्रवाहांजवळ

आपण बसू शकतो. कंटाळा कधीच येत नाही. हे संगीत या प्रदेशातील शांततेचाच एक भाग आहे.

आम्ही आमच्या जेवणाचे डबे उघडतो. परोठा, जॅम व चीज. पाण्याचा प्रश्न नाही. प्रवाहाचे पाणी अगदी स्वच्छ, थंड व चवदार आहे. जेवण संपले. देसाई प्रवाहाजवळ जाऊन त्यांचा डबा पाण्याने व मातीने घासून पुसून स्वच्छ करतात. मी माझा डबा नुसता बंद करतो, व व्यंकीला माझ्या पाठीवर असलेल्या रकसॅक-मध्ये ठेवण्यास सांगतो. रकसॅक पाठीवरच ठेवणे सोयीचे वाटते. बसल्यावर सुद्धा. मागे तिच्यावर रेलून व्यवस्थित बसता येते.

आम्हाला प्रवाह ओलांडून पलीकडे जावयाचे आहे. खोली नाहीच. पाण्यातून सहज ओलांडता येईल, पण बूट व पायमोजे भिजून जातील. पुन्हा ते वाळविण्याची व बदलण्याची कटकट. तसेच घालून फिरणे बरे नाही. शिवाय पाणी अगदी बर्फा-सारखे गार आहे. तेव्हा पाण्यात पाय न भिजता पलीकडे जायचे आहे. प्रवाह ओलां-डण्यासाठी एक झाडाचे खोड आडवे टाकले आहे. प्रवाहाच्या १५ फूट उंचीवर ते आहे. त्याच्या जवळ उभे राहून ओवळेकर घरतला त्यांचा फोटो काढावयास सांगतात. घरत त्यांची थट्टा करतो. अशी आमची एकमेकांची थट्टा नेहमीच चाल-लेली असते. पण ती कोणालाच बोलत नाही. आमचा वेळ खरोखर मजेत चालला आहे.

काही हमाल प्रवाहाजवळ येऊन पोहोचले आहेत. आम्ही पुढे निघायचे ठरवितो. घरत त्या झाडाच्या खोडावरून पलीकडे जातात. १।। फूट जाडीच्या नळासारखे ते आहे. तोल संभाळून जावे लागते. नाहीतर खाली प्रवाहात थंड पाण्याची आंघोळ व थोडाफार मार लागायचा. घरतच्या नंतर मी जातो. पायात मोठे व जड बूट अस-ल्याने मला जरा धाकधूक वाटते. एवढ्यात तेथे पोहोचलेल्या जयसिंगने प्रवाहात मोठमोठे दगड टाकून वाट केली आहे. "साब, नीचेसे जाव. अच्छा रहेगा." तो मला म्हणतो. मला ते कमीपणाचे वाटते. मी या सर्वांचा प्रमुख आहे. माझी प्रतिष्ठा राखण्यासाठी मला वरूनच गेले पाहिजे. मी घाबरतो. असा कोणाचा समज होता कामा नये. माझा स्वतःवरचा विश्वास वाढविण्यासाठी देखील मला हे करावयास हवे. एवढ्यासाठी मी त्या खोडावर पाऊल टेकतो. पहिल्या दोन–तीन पावलांचे काही विशेष वाटत नाही. कारण जमीनीपासून खोडाची उंची अगदीच थोडी आहे. नंतर मात्र प्रवाहाच्या वर आल्यावर अस्थिर वाटते. तारेवर कसरत करणारे ज्याप्रमाणे हातात वांबू धरतात त्याचप्रमाणे मी बर्फाच्या कुऱ्हाडीचा तोल सावरण्यासाठी उप-योग करतो. तरी सुद्धा कोणत्याही क्षणी तोल गेल्यास हात टेकून 'चार' पायांवर जाण्याच्या तयारीत असतो. पण तसा प्रसंग येत नाही. मी पलीकडे पोहोचतो. भीती पण वाटली नाही. मला वाटते मी बरे केले. माझ्यानंतर ओवळेकर निघतात. त्यांना जमत नाही. दोन चार पावलांनंतर ते परत फिरतात व खालच्या रस्त्याने येतात.

देसाई व व्यंकी नंतर येतात. देसाई नेहमीप्रमाणे ठीकठाक नाहीत. व्यंकीचा मूड गेलेला वाटतो.

पलीकडे ते खोड टेकले आहे तेथून ५–१० फूटाचीच पण उभी चढण आहे. माती भराभर घसरते. पाय ठेवताच मातीवरोबर तो खचतो. पटापट पावले उचलीत चढावे लागते, म्हणजे खाली जायला अवसरच मिळत नाही. नंतर पुन्हा पायवाट आहे. वाटेत एक प्रचंड खडक व त्याच्याखाली घळीसारखी जागा आहे. कपडचांची काही वोचकी तेथे पडली आहेत. आमच्या हमालांपैकी काही येथे रात्र काढणार असावेत. चांगली थंडीवाऱ्यापासून सुरक्षित जागा आहे. आणखी थोडे चढल्यावर आम्ही दिव्रुगेटाच्या मैदानावर येतो, पण मैदानावर पाणी नाही. येथे आम्हाला कॅम्प करता येणार नाही. आमचा कॅम्प मैदानाच्या पूर्वेकडील बाजूस असलेल्या प्रवाहाच्या पलीकडे जंगलात आहे. पुन्हा एका छोटयाशा दरीत उतरून आम्ही प्रवाहाजवळ येतो. दगडांवरून उड्या मारीत तो ओलांडतो. आमचा कॅम्प जवळच आहे.

कॅम्पची जागा सुंदर आहे. सभोवती पाईन वृक्षांचे जंगल आहे. एका झाडाच्या खोडावर चाकूने ' Nandadevi 1965 ' कोरलेले आहे. ह्या बाजूला जाणाऱ्या मोहिमांचे नेहमी येथेच कॅम्प करतात. धनगरांचा हा शेवटचा तळ आहे. याच्या पलीकडे ते जात नाहीत.

चहा तयार आहे. चहा घेऊन मी माझ्या तंबूत आराम करीत आहे. पुढील योजनांबद्दल मनात विचार येतात. देवडीलाच मुख्य तळ का करू नये ? जवळजवळ १७ हमालांना आम्हाला परत पाठविता येईल. देवडीच्या पुढच्या तळाची जागा आम्हालाच शोधावी लागणार आहे. एवढे सर्व सामान व हमाल बरोबर घेऊन ती शोधत फिरण्यात अर्थ नाही. शिवाय एवढे हमाल परत पाठविल्यास आमचा हमालांच्या अन्नाचा प्रश्न पण सुटेल. अजून आमच्याकडे पुरेसा शिधा नाही. ' What is the position of rice and atta ?' हा माझा रोजचा प्रश्न. सर्वांना हसू येते. मी नकाशा काढून पहातो. नंतर आमचा पुढला तळ नकाशावर ठरविलेल्या ठिकाणाच्या थोडा वर लावता येण्याची शक्यता वाटते–नकाशावरून. माझा विचार पक्का होतो.

आता सर्वजण कॅम्पमध्ये पोहोचले आहेत. मी माझी कल्पना माळी, लोपसांग व देसाई यांना सांगतो. इतर सदस्य पण तेथेच आहेत. आम्ही त्या योजनेवर चर्चा करतो. चर्चा करताना छायाचित्रे पण घेतली जातात. सर्वांना ती योजना आवडते. आम्ही लोपसांगला परत पाठवावयाच्या १७ हमालांची यादी करावयास सांगतो. अरोरा व व्यंकी यांना त्यांचे हिशेब पूर्ण करण्यास सांगितले जाते.

लोपसांग सर्व हमालांना एकत्र बोलावतो. " साब, कोई आदमी बऱ्हाल के पिच्छे गये है. " कोणीतरी सांगतो. अखेर तो शिकारी आमच्याबरोबर आला तर ?

आम्हाला पत्ताच नव्हता. आणखी काही हमाल जंगलात मिळणारा भाजीपाला आणावयास गेले आहेत. हे सर्व परत येईपर्यंत थांबले पाहिजे.

आता संध्याकाळ झाली. संधीप्रकाशासारखा प्रकाश पडलेला आहे. खरे म्हणजे फक्त ५॥–६॥ झालेत. पण आम्ही दरीत असल्याने जास्त संध्याकाळ झाल्यासारखी वाटते. आसपासचे जंगल निस्तब्ध आहे. प्रवाहाच्या पाण्याचा आवाज येतो. वातावरणात गूढता आहे. आमच्या कॅम्पमध्ये चूल पेटलेलीच आहे. अरोरा त्याच्या तंबूत बसून परत पाठवावयाच्या हमालांची नावे लिहून घेत आहे. लोपसांग पण तेथे आहे. कोणाला परत पाठवायचे व कोणाला ठेवायचे हे मी त्याच्यावर व अरोरावर सोपविले आहे. तबूच्या भोवती जरा गर्दीच झाली आहे. कोणाच्याच मनात येथून परत जावयाचे नाही. थोडासा गोंधळ चालल्यासारखा वाटतो. मी अरोराला तंबूच्या बाहेर मोकळ्या जागेत येण्यास सांगतो.

व्यंकी हिशोब पूर्ण करीत आहे. त्याने ताबडतोब कामाला सुरुवात केली. जेवणानंतर पण त्याचे काम चालूच होते. तो काळजीपूर्वक व पद्धतशीरपणे काम करतो. पण काही वेळेला उगाचच लांबण लावतो की काय असे वाटते.

आमच्या जेवणात हमालांनी जंगलातून आणलेली भाजी पण आहे. मला ती काही आवडली नाही. जेवणानंतर नेहमीप्रमाणे आम्ही चुलीभोवती गप्पा मारीत बसतो. लोपसांगची तपकीर संपली आहे. आता तो सिगारेटकडे वळला आहे. खूप सिगारेटस् ओढतो. डॉक्टरांच्या मित्राने भेट म्हणून दिलेले चिरुटाचे पाकीट आज आम्ही उघडले. प्रत्येकाने हौसेने चिरुट पेटविला – अरोरा व व्यंकी सोडून.

मी माझ्या तंबूत जातो. व्यंकीचा हिशेब आता झालेला आहे. तो व माळी त्यांच्या तंबूत बसून तेच काम करीत होते. "What is the total amount?" मी ओरडून विचारतो. "One thousand sir" त्याचे उत्तर येते.

आता झोपेची तयारी. आज मी जरा खुषीत आहे. एक महत्त्वाचा निर्णय घेतल्याचा गर्व आहे. मानवी मन कसे क्षुद्र असते !

## २७ मे

७॥ ही आमची निघायची वेळ ठरून गेली आहे. सर्वांमध्ये एक आळशीपणा आला आहे. आम्ही सर्व गोष्टी अगदी आरामात करतो. निघायची तयारी करायलाच फार वेळ लागतो. मला सुद्धा आराम करावासा वाटतो. हा प्रदेश, येथली हवा, इतकी सुंदर आहे की येथे रेंगाळावे व त्याचा पूर्ण आस्वाद घ्यावा असे वाटते. एखादा चवदार पदार्थ चाखत माखत खावा त्याप्रमाणे येथला प्रत्येक क्षण अनुभवीत, प्रत्येक हात, रंग, आवाज मनात साठवीतच पुढे जावे असे वाटते.

निघण्यापूर्वी प्रथम हमालांना बोजे वाटावयाचे. बहुतेक हे सर्व काम लोपसांगच करतो. त्याचा अनुभव व कौशल्य चांगलेच उपयोगी पडते. मी तेथे उभा राहून सर्व पहातो व मधून मधून काही सूचना करतो.

काही हमाल पुढे निघाले आहेत. काही तरी गडवड दिसते. दोघेजण आमच्या कॅम्पच्या वर ५० फूटावर बसले आहेत. "Mr. Chandekar, go ahead and see what has happened" अरोरा ओरडतो. मला ते आवडत नाही. मी प्रमुख आहे ना ? मला अरोराने काम कसे सांगायचे ? लोपसांगला ते आवडले नाही असे वाटते. तो अरोराला काहीतरी म्हणतो. "You should ask Bada Saab" असे काहीतरी मला ऐकू आले. लोपसांगचा चेहरा किंचित उतरला. त्याला माझ्या चेहऱ्यावर नाखुषी दिसली असली पाहिजे. आपण याला जबाबदार आहोत असे त्याला वाटत असणार. लोपसांगने अरोरालाच पुढे जाऊन पहाण्यास सांगितले होते, पण मी तयार असल्याने अरोराने ते मला सांगितले. अशा बारीक सारीक घटनाच आपल्याला बऱ्याच वेळा स्वतःची ओळख नव्याने करून देतात.

पण मी पुढे जातो. एक हमाल अगदी रडकुंडीला आला आहे. त्याचा बोजा फार जड आहे. "साब ये बहोत भारी है. मैं मर जाउंगा" तो म्हणतो. मी त्याला समजावण्याचा प्रयत्न करतो. एवढ्यात लोपसांग तेथे येऊन पोहोचतो "Yon go ahead sir. I will handle this" तो म्हणतो. मी पुढे निघतो. माझ्यापेक्षा तोच हा प्रश्न – वेळ पडल्यास थोडे वजन थोडा वेळ स्वतः घेऊन, चांगल्या तऱ्हेने सोडवेल याची मला खात्री आहे.

आणखी थोडे वर त्या दाट जंगलातल्या एका छोटयाशा मोकळया जागेत बाकीचे हमाल बसले आहेत. "नमस्ते सरकार" भीमसिंग म्हणतो. तो आम्हा सर्वांना सरकार म्हणतो. "कैसे हो ?" मी विचारतो. "आपके कृपासे सब ठीक है सरकार, खाना है, चाय है, और सिगरेट भी है." तो हात जोडून म्हणतो. म्हातारा पक्का आहे, पण काम चांगले करतो. बाकीचे हमाल पण 'नमस्ते साब' म्हणतात. सर्वांचे चेहरे आनंदी आहेत. आम्ही १७ माणसांना परत पाठवावयाचे ठरविले त्याबद्दल कोणीच काही तक्रार केली नाही.

आम्ही पाईनवृक्षांच्या एका सुंदर जंगलातून चढत आहोत. जंगल अगदी दाट आहे. रस्त्यावर गर्द सावली आहे. हवा चांगली थंड आहे. पायवाट स्पष्ट आहे. वाटेवर कुजलेली पाने व फांद्या एवढया आहेत की माती दिसतच नाही. रबरावरून चालल्यासारखे वाटते. आम्ही आरामात थांबत थांबत चढतो. आज काही फार चालावयाचे नाही. दिब्रुगेटापासून देवडी जवळच आहे. जेवणाच्या वेळेपर्यंत सहज पोहोचू. या जंगलातील चढण १००० फुटापर्यंत असेल.

काही वेळाने जंगल संपते व आम्ही वृक्षरेषेच्या वर पोहोचतो. आता वाटेवर काटेरी झुडपे आहेत. वाट पर्वताला बिलगून चालली आहे. काही जागा चांगल्याच

धोक्याच्या आहेत. आमच्या डाव्या हाताला हनुमानच्या दक्षिण बाजूचे कडे आहेत. उजव्या बाजूला दरीत खोल खाली ऋषिगंगा नदी वहात आहे. मधून मधून ती आम्हाला दिसते. फेसाळून वहाणाऱ्या पाण्याची पांढरी स्वच्छ पट्टीच दिसते. काही वेळेस तिची गर्जना पण ऐकू येते. हनुमानचे कडे सरळ खाली दरीत उतरून नदीच्या प्रवाहाला मिळतात. एखादा घसरलाच तर १०००–२००० फूट खाली दिसणाऱ्या झुडपापर्यंत त्याला काहीच थांबवू शकणार नाही. थांबलाच तर वाटेत वर आलेल्या एखाद्या खडकावर आपटूनच! नदीच्या पलीकडे रोंती पर्वताच्या भिंती, टांगती जंगले, मोरेन व त्याच्यावर पांढऱ्या शुभ्र बर्फाने भरलेल्या घळी.

आम्ही सहा जण बरोबर आहोत. माळी, डॉक्टर व व्यंकी मागे आहेत. १०॥ चा सुमार असावा. एक कोपरा ओलांडताच समोर खाली नदीला जाऊण मिळणारा सुंदर प्रवाह. आम्ही त्या प्रवाहाजवळ बसतो. आकाश स्वच्छ आहे. आमच्याजवळ बिस्कीटे व गोळ्या आहेतच. मला उठून पाणी पिण्याचा कंटाळा आला आहे. प्रकाश मला पाणी आणून देतो. "अरे, Where are we? Let us see the map." कोणीतरी म्हणतो. नकाशा देसाईजवळ आहे. नकाशा, कंपॉस, थर्मामीटर वगैरे वस्तु देसाई हौसेने आपल्या रकसॅकमध्ये ठेवतात. आपण कोठे आहोत याबद्दल आमचे सर्वांचे एकमत होते. बरे वाटते. आता खरे म्हणजे उठायला पाहिजे; पण कुणाला तरी सिगारेट ओढायची आहे. मग आम्ही सर्व एकेक सिगरेट ओढतो. म्हणजे या सुंदर प्रवाहाजवळ आणखी दहा मिनिटे.

या प्रवाहाच्या अगोदर लागणारा कोपरा ओलांडून हमाल येताना दिसतात. सरळ कड्यातील अरुंद वळचणीवर ते चालत आहेत—प्रवाहाच्या जरा अलीकडे. एवढा मोठा बोजा घेऊन ते किती सहज चालतात. मी एक फोटो काढतो.

आता आम्ही उठतो. घरत सर्वांच्या पुढे आहे. पायवाट स्पष्ट आहे. आम्ही आंधळेपणाने तिच्यावरून जातो. रस्त्यात एक ऱ्होडेडेनड्रॉनचे झाड लागते. त्याच्या वर एक फुलांचा गुच्छ आहे. हा खरा त्या फुलांचा सीझन नाही. काही वेळ त्या फुलांचे कौतुक करण्यात जातो. आता वाट खाली जात आहे; तरी सुद्धा आम्ही चालत रहातो. आम्ही सारखे खाली, खाली जातो. शेवटी पायवाट अस्पष्ट होते. आता मात्र मला शंका येऊ लागते. आम्हाला देवडीला वरच्या बाजूस तळावर जावयाचे आहे. मी ओरडून घरतला थांबावयास सांगतो "पुढे पायवाट स्पष्ट दिसते का? निदान आपल्यापुढे गेलेल्यांची पावले तरी?" त्याला दोन्ही दिसत नाही. आम्ही घोटाळ्यात पडतो. तरी सुद्धा आणखी थोडे पुढे जातो. अगदी अरुंद अशी एक पायवाट सरळ खाली नदीकडे उतरत आहे. "हे ऽऽ" एवढ्यात अरोरा मागून ओरडतो. तो सर्वांच्या शेवटी येत आहे. आमच्या डाव्या बाजूला बऱ्याच उंचीवर त्याला हमाल दिसत आहेत. आम्ही सर्व थांबतो. वाट चुकविल्याबद्दल सर्वजण घरतला शिव्या घालतात; पण आमच्यापैकी प्रत्येकाने हीच चूक केली असती याची मला खात्री आहे.

अरोराने हमालांच्या दिशेने वर चढावयास सुरुवात केली आहे. मला तो दिसत नाही. मी ओरडून अरोराला थांबावयास सांगतो. " See that they are definitely taken tent you see and not same rocks, otherwise we will again be in trouble. " आम्ही सरळ त्या उभ्या डोंगरावर चढू लागतो. जितक्या जलद जमेल तेवढ्या जलद आम्ही चढत आहोत. काटेरी झुडपातूनच चढावे लागते. सगळीकडे ही काटेरी झुडपे आहेत. ती टराटर आमच्या पॅन्टस् ओरबाडतात. पायवाट नाहीच. आम्ही सर्व निरनिराळ्या बाजूने वर चढतो. शेवटी मी अरोराजवळ पोहोचतो. तो पायवाटेवर बसला आहे. मी दमून बसकण मारतो, एकेकजण येत आहे. घरत माझ्याजवळ येऊन बसतो. सर्वात शेवटी ओवळेकर येत आहेत. चढता चढता त्यांचे व लोपसांगचे बोलणे चालले आहे. 'माझ्यापासून' जवळ जवळ १०० यार्डावर ओवळेकर आहेत व लोपसांग एका टेपाडाच्या मागे आहे. मला तो दिसत नाही. त्यांचे बोलणे पण स्पष्ट ऐकू येत नाही. ओवळेकरांना " डॉ. व माळी दिसताहेत का ?" म्हणून मी विचारतो. " हो हो, लोपसांगच्या मागेच आहेत. " ते सांगतात. आम्ही रस्ता चुकलेले पाहून आम्हाला परत वाटेवर आणण्यासाठीच लोपसांग आमच्यामागे येत होता असे वाटते.

बाकीचे हमाल येत आहेत. " All the best " डॉक्टरसाहेब पोहोचले. माळी व व्यंकी पण आहेत. आम्ही सर्व एकत्र बसतो. " Gharat, have this pan. " डॉक्टरांनी आणलेले विड्याप्रमाणे घडी केलेले पान ते घरतला देतात. ते दोघे पानाचे फार शौकीन.

१२ वाजायला आले आहेत. पण ऊन जाणवत नाही. कारण उंची. आम्ही १२००० फुटाच्यावर नक्की असणार. हमाल व शेरपा पुढे गेले आहेत. आम्ही पण निघतो. वाट आता सरळ याच उंचीवरून जाते. छोटे मोठे चढ उतार आहेतच. आम्ही सावकाश गप्पा मारीत चालतो. वाटेवर दोन ठिकाणी मात्र बराच धोका होता. अगदी अरुंद घसरडी पायवाट. ती पण सरळ थोडी खाली उतरणारी, व एका बाजूला खोल दरी.

१॥ चा सुमार असावा. समोर वाटेवर एक प्रचंड खडक आडवा आला होता. एखाद्या भिंतीसारखा. जवळजवळ ४०० फूट उंच. आमचे हमाल अगर शेरपा यापैकी कोणीही त्याच्या पलीकडे जाताना दिसत नव्हते. खरे सांगायचे म्हणजे त्या खडकापलीकडले आम्हाला काहीच दिसत नव्हते. त्याने समोरचा सबंध भाग व्यापला होता. बहुधा याला खालच्या बाजूने वळसा घालावा लागणार असा आमचा विचार. पण देवडीचा तळ त्याला लागूनच अलीकडल्या बाजूला होता. थोड्याच वेळात आम्ही कॅम्पवर पोहोचलो. आता ती ४०० फुटाची सरळ भिंत आमच्या अगदी समोर ठाकली होती— आमच्या कॅम्पच्या पूर्वेस ती अभेद्यच वाटत होती. आमची पूर्वेकडील बाजू तिने पूर्णपणे झाकली होती.

चहा तयारच होता. चहाबरोबर आम्ही जेवण उरकीत होतो. " This cannot be our base camp ". माझी खात्री पटली. खरे म्हणजे ती भिंत पाहून मला धकाच बसला होता. याच्या पलीकडे आपण सामान कसे नेणार ? १७ हमाल परत पाठवल्यावर ते अशक्यच होते. लोपसांगला पण ते पटले. " Sir, I have never seen such a mountain. I have never seen such a march to the base camp. " तो म्हणाला. " अभीतक हनुमानका दर्शन भी नही." खरोखरच मालाथुनी खिंड ओलांडल्यापासून पुन्हा आम्हाला आमचा हनुमान दिसला नव्हता. आम्ही त्या पर्वताच्याच खालच्या उतारांवर होतो. पण प्रचंड कडे मधे असल्याने शिखर दिसत नव्हते. आम्ही पर्वताला वळसा घालीत आहोत. प्रदक्षिणा घातल्या-प्रमाणे.

देवडीला कॅम्पसाठी दोन जागा आहेत. एक खाली नदीच्या किनाऱ्यावर व दुसरी ही वरची. आम्हाला हनुमानच्या पूर्वेकडील उतारावर शक्य तितक्या उंच आमचा बेस कॅम्प ठोकावयाचा होता. म्हणून आम्ही वरच्या देवडीला आलो होतो. आमच्या कॅम्पच्या पूर्वेला ती प्रचंड भिंत, उत्तरेला हनुमानचे प्रचंड कडे व दक्षिणेला ऋषि-गंगेची ती भयानक दरी. सर्व बाजूने सुरक्षित अशी ती जागा होती. कोणत्याही बाजूने वारा येऊ शकत नव्हता. जवळच एक प्रवाह आहे. पर्वतावर बर्फ वितळले म्हणजे दुपारी १२ च्या सुमारास तो वाहू लागतो. व रात्री बर्फ गोठले म्हणजे पुन्हा बंद होतो. आम्हाला मुंबईच्या ठराविक वेळेलाच पाणी देणाऱ्या नळाची आठवण झाली.

आमचा बेस कॅम्प येथे करता येणार नाही यावद्दल शंकाच नको. नकाशावर माझी योजना उत्तम वाटली; पण हिमालयाच्या परिमाणाने आम्हाला फसविले होते. असलेल्या सर्व हमालांसह पुढे जाणे भाग होते. मला दिब्रुगेटाला रात्री झोपताना मनात आलेल्या अहंभावनेची आठवण झाली. गर्वहरण झाले होते.

आता आणखी प्रश्न उभे राहिले. दुराशीला ९ बोजे सोडून पुढे आलो होतो. ते पुढे आणणे आवश्यक होते. त्यासाठी काल संध्याकाळीच ९ हमालांची योजना केली होती. हे ९ हमाल देवडीला सामान ठेवून, दुराशीची वाट चालू लागले होते. शिवाय १७ हमालांना येथून परत पाठवायचे होते. कोणी परत जायचे हे पण ठरविले होते. त्या १७ हमालांनी आपले आंथरूण–पांघरूण दिब्रुगेटालाच ठेवले होते, व जास्त वजन बरोबर नको म्हणून, परतीच्या वाटेसाठी दिलेला दोन दिवसाचा शिधा पण तेथेच ठेवला होता. आजची रात्र दिब्रुगेटाला काढून ते परत जाणार होते. त्यांना आता आमच्याबरोबर पुढे चला, आंथरूण–पांघरूणाशिवाय-असे कसे सांगायचे ? त्यांना आम्ही सर्व परिस्थिती समजावून सांगितली. त्यांनी जर पुढे जाण्यास नकार दिला, तर आमची परिस्थिती कठीण होती. मोहीम येथेच संपण्याची शक्यता होती. पण ते आल्या प्रसंगाला तोंड देण्यास तयार झाले.

देवडीच्या पुढच्या एका कॅम्पपर्यंत यायची त्यांनी तयारी दाखविली. एक रात्र कोठेतरी खडकात–घळीत काढण्यास तयार झाले – पांघरूणे असोत वा नसोत " सरकार, आपके लिये क्या हम इतनाही नही कर सकते ?" म्हातारा भीमसिंग हात जोडून म्हणाला. " हम भागिनी तक कल जायेंगे. हनुमानके लिये एक पडाव आगे जाना पडेगा." दुसऱ्या कोणत्यातरी मोहिमेबरोबर त्या दरीत तो पूर्वी गेला होता. त्या दरीच्या उत्तर टोकाला असलेल्या बागिनी खिडीमुळे त्या कॅम्पला तो भागिनी कॅम्प म्हणत असावा. खरोखर ही माणसे केवळ पैशासाठी एवढा त्रास घेऊन आमच्याबरोबर येत होती की, आम्हाला मदत करण्याची त्यांची इच्छा होती, हे मला उमगेना. त्यांच्यात व आमच्यात एक जवळीक निर्माण झाली होती हे खरे. हनुमान म्हणजे देवाचे नाव असल्याने आमच्या मोहिमेला त्यांच्या दृष्टीने धार्मिक महत्त्व असावे. त्यांना आमच्या यशापयशात रस होता हे निश्चित. मुंबईत या भागातील हमालांबद्दल ऐकले होते त्यापेक्षा हा अगदी वेगळाच अनुभव होता. कसे का असेना आमचा प्रश्न सुटला होता. पण फक्त १९ हमालच आमच्याबरोबर राहिले. येथे पण काही बोजे ठेवून पुढे जावे लागणार. त्या माणसांबद्दल आम्हाला अधिकच वाटू लागले. आम्ही त्यांना थोडा अधिक व चांगला शिधा देऊ लागलो.

आता आमचे डोळे त्या भिंतीकडे वळले. मी जयसिंगला विचारले. " क्या इसके उपर रास्ता है " " हाँ साब, लेकीन बहोत खतरा है " एकाने उत्तर दिले. समोरचा तो खडक अगदी भिंतीसारखा वाटत होता. याच्यावर रस्ता कसा असू शकेल हे आम्हाला समजेना. हमालांच्या चेहऱ्यावर काहीच काळजी किंवा भीती दिसत नव्हती. आम्हाला करनाळ्याच्या सुळक्याची आठवण आली. पण याच्यापुढे करनाळा म्हणजे काहीच नाही. मी तर टरकलोच. आमच्या विमा पॉलिसीची मला आठवण झाली. मुंबईहून निघताना आमच्यापैकी प्रत्येकाचा २००० रुपयांचा विमा उतरविला होता व शेरपांचा ३००० रुपयांचा. आणि येथे हे हमाल बोजे घेऊन चढणार. " लोपसांग, आप जाके थोडा रस्ता देखके आयेंगे. See if it is necessary to put up ropes." मी म्हणालो. दुपारचे २॥ वाजले होते. " Yes sir " लोपसांग म्हणाला. तो लागलीच तयार झाला. त्याच्याबरोबर कोणीतरी रस्ता माहित असलेला जायला पाहिजे. " साब, मैं जाऊंगा " मीरवानसिंग म्हणाला, तसे पाहिले तर मीरवानसिंग फाटक्या अंगाचा. त्याचे कपडे इतरांप्रमाणेच थोडे फार फाटलेलेच. पायातला हंटर बूट पण कोणी तरी दिलेला असावा. फाटलेलाच होता. तो त्यानेच सुई-दोऱ्याने शिवला. तसाच तो वापरत होता. तो नेहमीच जड बोजा उचलतो. आता आपला बोजा येथे पोहोचवून तो पुन्हा लोपसांगबरोबर जाण्यास तयार झाला आहे. चांगलाच तगडा आहे. मीरवानसिंगसारखी आणखी काही माणसे आमच्या मोहिमेत मनाने पण सामील झाली होती.

ते दोघे ताबडतोब निघतात. पाठीवर ओझे नसल्याने भराभर जातात. पहाता पहाता त्या भिंतीवर चढावयास सुरुवात करतात व केवळ २२ मिनिटात वर टोकावर पोहोचतात. हिमालयाच्या प्रचंडतेचा, त्याच्या वेगळयाच परिमाणाचा हा आणखी एक अनुभव होता. समोरून अगदी भिंतीसारख्या सरळ दिसणाऱ्या खडकावर माणसाला चालता येईल एवढ्या वळचणी होत्या. आम्ही दुर्बिणीतून त्यांना वर जाताना पहात आहोत. "ओ वा ऽ वा ऽ कमाल आहे" आम्ही त्यांचे कौतुक करतो. त्यांच्या हालचाली खरोखरच एखाद्या नर्तकाच्या पदन्यासाप्रमाणे, रेखीव व Rhythmic आहेत. ते भिंतीच्या टोकावर जाऊन पलीकडे दिसेनासे होतात. "आता लोपसांग बहुतेक पलीकडे जाऊन पुढल्या कॅम्पची जागा पाहूनच येईल" कोणीतरी म्हणाले. "No no, he will go to the summit of Hanuman" इति देसाई. देसाई फारसे बोलत नाहीत. पण बोललेच तर त्यात मिस्कीलपणा असतो. लोपसांग सगळयांचाच आवडता झाला आहे. तसे पाहिले तर आमच्या बरोबर असलेले हमाल, लोपसांग व दोरजे, सर्वच जण आम्हा सर्वांना आवडतात. सदा हसतमुखाने आमची सेवाच ,करणारा कुदनसिंग, मनापासून काम करणारा व मुख्य म्हणजे केवळ प्रदेश पहाण्याची संधी मिळावी म्हणून बरोबर आलेला बहादुर सिंग. भीमसिंग मुलाचा बोजा लचलण्यासाठी आला व आमच्या बरोबरच राहिला. व्यवहारी असला तरी त्याच्या वागण्यात आपलेपणा जरूर आहे. फारसे न बोलणारे केवळ बोजा उचलणार. इतर माणसे पण निरागसपणे हसून व प्रत्येक वेळा आदराने सर्वांना नमस्ते करतात. त्यात लाचारी नाही. आमच्याजवळ येण्याचा प्रयत्न आहे. गप्पा मारण्याची हुशारी नसल्याने ते या मार्गाने जवळीक साधू पहातात.

लोपसांग व मीरवानसिंग आता परत येत आहेत. आम्ही Conference tent मधून त्यांना पहात होतो. सर्व जण उठून बाहेर येतात. कोणी तरी त्यांना चहा आणण्यासाठी धावतो. थोड्याच वेळात ते पोहोचतात. मीरवानसिंगचा चेहरा उन्हाने लाल झालेला आहे. लोपसांग मात्र फारसा थकलेला दिसत नाही. आपला जोम टिकवून पर्वतात वावरण्याची कला त्याला अवगत आहे. हाच गिर्यारोहक व इतर सामान्य माणसातला मोठा फरक. आम्ही सर्व त्यांच्या भोवती बसतो. "रास्ता कैसा है साब !" मी लोपसांगला विचारतो. "रास्ता तो है but you have to be careful here. You must not miss a step. अगर मिस हो गया तो गया. No first aid" तो म्हणतो. दोर बांधण्याची जरूरी आहे असे त्याला वाटत नाही.

आता आम्हाला कामाला लागले पाहिजे. उद्यासाठी बोजे तयार केले पाहिजेत. काही येथेच ठेवायचे आहेत. ते नंतर पुढे आणावे लागतील. आम्ही उठतो. ओवळेकर याद्या घेऊन उभे रहातात. सारख्या बदलणाऱ्या बोजांमुळे त्यांचे काम खरोखर फार कठीण आहे. पण ते त्यांच्या नेहमीच्या व्यवस्थितपणाने करतात.

या कॅम्पच्या एका कोपऱ्यात एक लहानसे खोपटे आहे. दगड रचून केलेले. " This hut was built by Nandadevi expedition 1965. " असे त्याच्यावर कोरलेले आहे. " सर, आपण याच्यात काहीतरी सुधारणा करून आपले नाव पण लिहू या " प्रकाश म्हणतो. " No no, we must not defile these places " व्यंकी म्हणाला. त्यावर थोडी फार चर्चा. तोपर्यंत वेळ झालेली आहे. अंधार पडू लागतो.

सध्याकाळ संपली. रात्र. समोरची भिंत आमच्या सर्वांच्या मनात आहे. " प्रत्यक्षात ती एवढी कठीण वाटणार नाही " देसाई म्हणतात. खरे म्हणजे आम्ही एकमेकांना धीर देत आहोत, तरी आमचा अनुभव तसा आहे हे मात्र खरे, लांबून फार कठीण व धोक्याची वाटलेली करनाळच्याच्या सुळक्याची चढण प्रत्यक्षात सोपीच वाटली. पण मी मनात जरा घाबरलो आहे.

आज मी व घरत एका तंबूत आहोत. माळींच्या तंबूत डॉक्टर गेले आहेत.

झोपण्याच्या पिशवीत शिरताना पण माझ्या मनात उद्याची चढण आहे. मला दुराशी खिंड ओलांडण्यापूर्वीच्या रात्रीची आठवण येते.

(क्रमशः)


## पुरंदऱ्यांची नौबत

बुलंद बुरूज / हूल / कोजागिरीची रात्र / पंत
फोंडा ! फोंडा ! / नावजी बलकवडे
पिऱ्या बेरड / इमान

आठ शिवकालीन कथा

ब. मो. पुरंदरे
किंमत साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन

चौथी सचित्र आवृत्ती

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

राजहंस प्रकाशन
पुणे




गोष्ट फार जुनी आहे. पण मनाला चुटपूट लावण्यासारखी आहे. कदाचित तिच्यावर तुमचा विश्वास बसणार नाही इतकी चमत्कारिकही आहे ती. " कसं शक्य आहे ? अशक्य ! अगदी अशक्य ! " असंच तुम्ही राहून राहून म्हणाल. परंतु गोष्ट जशी घडली तशी ती सांगण्याचा मोह मला आवरता येत नाही. त्याला मी तरी काय करूं ?

एका मामुली तमासगिरानं अशक्य चमत्कार घडवून दाखविला होता. त्याचं नाव होतं नाना मनवेकर. भलता हिकमती माणूस ! जिद्दीचा, इरसाल असा. सातारा जिल्ह्यातील मनवे हे त्याचं गाव. दिसायला इतर तमासगिरासारखाच, पण भारी बेरकी–हटवादी–करारी !

त्यावेळी तात्या सावळजकर, शिवा-संभा कौलापुरकर, भाऊ फक्कड, बाबू कुपवाडकर अशी तमासगीर मंडळी तोलामोलानं एकमेकांना सामना देत असत. स्वत: कवनं करून गाणारी अशी ही सर्वच शाहीर मंडळी होती. पंधरा–वीस कलावंतांचा ताफा घेऊन हे शाहीर जत्रा–उरसाच्या निमित्ताने गावोगाव फिरत असत. मागणी तसा पुरवठा करणारे असे हे शाहीर असल्याने रसिक लोक त्यांना मोठ्या मानमरातबाने वागवीत असत.

नाथकवी गुनवडीकर

# मनव्याचा नाना



या तमासगीर शाहिरांच्या फडांचा प्रभाव म्हणा, नाही तर स्वयंस्फूर्तीनं म्हणा, मनव्याच्या नानानं तमासगीर होऊन तमाशाचा फड उभा करायचं ठरवलं. मग काय ? लागला की नाना कामाला. तमासगीर मंडळी जमवायला केली त्यानं सुरुवात. आज याला भेट, उद्यां त्याला भेट असं घडू लागलं. तमाशाचा फड उभा करणं म्हणजे साधी गोष्ट नाही. प्रत्येक पात्राला गायकी यायला हवी असते. गण–गौळणी–लावण्या त्यांनी आवाज टीपेला लाऊन खड्या सुरात गायला हव्या असतात. अशी आवाजाची गाणारी माणसंच तमाशाला हवी असतात. तेच खरे तमासगीर. गण–गौळणी–लावण्या रचणारा, त्यांची प्रास–यमकांत बांधणी करणारा जो असतो त्याला तमाशा–शाहीर असं म्हणतात, व या रचलेल्या गण–गौळणी–लावण्या खड्या सुरांत गाणारे असतात ते तमासगीर.

पण अलीकडं या नियमाला सगळ्यांनीच चक्क धाब्यावरच बसवलेलं आहे. प्रत्यक्ष प्रास-यमकांत कवनांची बाळसेदार बांधणी न करता कुणी तरी करून ठेवलेली कवनं खड्या सुरात म्हटली की त्यालाच शाहीर म्हणायचं, हा पडला आहे आता रिवाज. आणि हेच नेमकं नानाला खटकलं. तमाशाचा फड आपण उभा करतो आहो खरा, पण तमाशाला लागणारा मालमसाला आणायचा कुणाकडून ?

पण कुणाला मागायचा ? गौळण कुणाकडून घ्यायची ? आणि लावणी कुणाला द्या म्हणायची ? छे ! हा असला ऐदी तमासगीर नको व्हायला. तर जडण–घडण करणारा तमाशा–शाहीरच व्हायला पाहिजे आपल्याला. असा विचार नानाच्या मनात आला. तरच आपल्याला आपला तमाशा–फडांत तात्या सावळजकरासारखं, शिवा–संभासारखं तोऱ्यांत उभं रहाता येईल. दुसऱ्यांनी करून ठेवलेली कवनं गाणारा शाहीर म्हणजे उष्टया पत्रावळी चाटत बसणाराच उंडगा तमासगीर नाही का ?

माणसं काय आज ना उद्या गोळा करता येतील, पण पहिलं काम कवनं बांधायचं. तेच आपण प्रथम करूं या, असा विचार नानानं केला. नानाजवळ ताल होता, सूर होता. आता फक्त झकास पैकी शब्दांची ठेवण करण्याची किमया जमली की, मग कवनंच कवनं. जिभेवर ताला-सुराला खेळवीत नाना कवनं बांधायला सरसावला. गण बांधला, गौळणी रचल्या. लावण्यांचीही मनोहारी गुंफण केली गेली. नानाचा उत्साह दुणावला. आता तमासगीर जमवायला काहीच हरकत नाही, असं त्याला वाटलं, म्हणून तो त्या कार्याला लागला.

“ काय नाव म्हणाला आपलं ? ”

“ रामा. ”

“ गायाला येतं ? ”

“ आक्षी म्हनावं तसं. भजनकऱ्यांत टाळ–पखवाजावर म्हननारा म्होरक्या मीच की व. गवळनी तर आक्षी ठसक्यात म्हनतूं मी. ”

“ आन् तुमी व पावनं ? ”

“ बोलपटाला आपला पयला लंबर म्हाराजा. लळितांत राजाचं, परधानाचं मीच करतूं काम. ”

“ शाबास ! आन् तुम्हाला काय येतं पावनं ? ”

“ मुरदुंग म्हनावा तसा घ्या ना वाजवुन. ”

“ असं कां ? झकास ! आन् तुम्ही ? ”

“ करा करा बोटं लवत्यात माझी बाज्याच्या पेटीवर. ”

नानाला सुरते मिळाले. सरदाराचं काम करणारी एक दोन माणसं मिळाली. ढोलकी–बाजाची पेटी वाजवणारेही मिळाले. आता नाच्याचं काम करणारी नाचे पोरं, नाही तर नाचणारणी बाया मिळाल्या की, नानाचा तमाशाचा फड उभा रहाणार होता. नानानं गावंच्या गावं पायपीट केली, पण नाचायला कुणी मिळेना. नाना मलु देवाच्या मुरळयांना भेटला. यल्लमाच्या जोगतीणींची त्यानं गाठ घेतली. त्या भेटल्या; पण नाचायला तयार नव्हत्या. आता ? नाचेपोरं मिळाली तर बघावी; पण ती सगळी कुठल्या ना कुठल्या फडांत नाच्याचं काम करायला गुंतलेली. नवा पोरगा नाचांत तरबेज करायचा म्हणजे थोडी यातायात करावी लागणार

का ? तेही करायचं ठरवलं; पण तसा कोरा करकरीत नाच्या पोरगाही नानाला मिळेना. नाना हताश झाला. बांधलेलं बळ एका नाच्या पोरामुळं लुळं पांगळं ठरलं. पण नाच्या न मिळण्याचं कारण होतं वेगळंच.

मनव्याचा नाना सवता शायरी करून तमाशाचा फड उभा करतो आहे, ही आवय झाडून सगळ्या तमाशा-फड चालविणाऱ्या मंडळींना हा हा म्हणता कळली. आम्हाला मागायचं गण—गौळणी—लावण्या, ऱ्या का दिल्या नसत्या आम्ही ? पण ते नाही. नवी रचना आणि तीही स्वतःची करून मनव्याचा नाना तमाशा करतोय काय ? कर म्हणावं कसा करतोस फड उभा ते ? अशा इरेला पेटून सर्वच तमासगिरांनीं नानाच्या कार्याला खो द्यायचं ठरवलं होतं. नानाला सुरते मिळाले आहेत. घ्या त्यांची गांठ अन् फितवा त्यांना, असा चंगच त्यांनी बांधला. पण तो टिकला नाही. का ? तर, 'तुमच्या फडांत घ्या आम्हाला, नाही जात आम्ही नानाच्या तमाशात.' असं सुरते म्हणायला लागले. मूळात फडांत माणसं ठासून भरलेली, तमाशाचं तंत्र जाणणारी, त्यांना टाकून या नव्या सुरत्यांना घेऊन काय करायचं ? हा पेच तमाशा-फड चालकांन पडला. आणि कसं का होईना, तमाशा फडात आपल्याला उभं राहायला मिळतंय—सोडा कशाला, असं नव्याने शिरणाऱ्या तमासगिरांना वाटल्यामुळं नानाला ही प्रभावळ मिळाली. पण नाच्याचं काम करणारी मंडळी हवी तेवढी मिळाली तर तोटा वाटत नसतो कुणाला. आमच्या फडात या, पण नानाच्या फडांत काय जाऊं नका, अशी ताकीद नवीन नाचकाम शिकणाऱ्यांना दिल्यामुळं नाचकामासाठी नानाला काही नाच्या मिळेना.

मूळचे उभे असलेले तमाशाफडांचे मालक नाच्या मिळू देईनात ही कुणकुण कुणाकडून तरी नानाच्या कानावर आली. असं आहे, नाही का ? काही हरकत नाही. नानानं नाच्या शोधायचा नादच दिला सोडून. पण तमाशा मात्र करायचाच उभा ही नानाची उमेद. नाच्या नाही तर तो तमाशा कसला ? आणि काय त्याला शोभा ? असं जाणत्यांनी तीन तीनदा बजावलं तरी, नाच्यावाचून आपण तमाशा उभा करून दाखविणार हा नानाचा हेका कायमच.

रोज गाण्याची बैठक भरायला लागली नानाच्या घरात. गण पाठ झाले. गौळणी चांगल्या बसल्या. लावण्याही अगदी मुखोद्‌गत झाल्या, पण नाच्याशिवाय तमाशात 'रुच्या' नाही, असं नानाच्या फडातील कलावंतांना खटकूं लागलं. नानानं तसंच आपलं घोडं दामटत चालवलं. एवढंच नव्हे, तर नानानं एका जत्रेची सुपारीसुद्धा घेतली.

"नानासायेब."

"काय म्हंता ? बोला."

"न्हाय न्हाय, तुमी ही जत्रंची सुपारी धरलीय, ती काय म्हनुन ?"

"काय म्हनुन मंजी ?"

" आवं, तमाशात न्हाय नाच्या. लोक उदळून लावत्याल ना तमाशा ?"

" हे बघा. सगळ्या कलाकारांनी आपापली बाजू संबळायची. नाच्याचं काय करायचं ते मी घेईन बघुन. तुमच्या कामात कुचराय करू नका मंजी जालं. "

यावर नानाच्या फडातली माणसं काय बोलणार? नाच्याशिवाय तमाशा आजवर कुठच झाला नाही. एवढंच त्यांना माहीत. आता नाना नाच्याशिवाय तमाशा करायचा म्हणतो आहे. मोठं धाडसाचं काम! काय का करेना नाना. शिव्या खायाची वेळ आली तर खाईल तो एकटा. फडांचा मालकच तो. आपल्याला काय करायचंय्. असा विचार करून नानाच्या फडातली माणसं निर्धास्त झाली.

जत्रेचा दिवस उगवला. सालाबादप्रमाणे छबिना आरवून-मिरवून आला. आता तमाशा उभा रहाणार. सगळी बघी माणसं देवळाम्होरं कडं करून बसली. मनव्याचा नाना आपल्या सार्जिद्यासह मुजऱ्यासाठी उभा राहिला. गण म्हणून झाला. आता ' म्होरा ' होणार. ढोलकी व हलगीची थोडा वेळ जुगलबंदी झाली की, ढोलकी लयबद्ध ठेका धरणार आणि त्या ठेक्यावर चाळांचा छुमछुमाट करीत नाच्या पोरं नाही तर बाया नाचरी पावलं टाकीत अलगद पुढं येणार. रिवाजाप्रमाणे ' म्होरा ' झाला. ढोलकीनं लयबद्ध ठेका धरला, आणि चारही पायात चाळ बांधलेलं रेडकू अंगावरची झूल झळकवित पुढं आलं. तोच...


# शिलंगणाचं सोनं

आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन

तमाशा बघायला आलेल्या माणसांनी टाळ्यांचा कडकडाट केला. नाच्याचं काम रेडकाकडून नाना करून घेत होता. माणसांना आकरित वाटत होतं. म्होरा संपला. रेडकू चाळ छुमछुमावयाचं थांबलं. आणि नाना गरजला–

"राधिके!"

"टाँय् ऽऽ!" रेडकू हुंकारलं.

"आज आपल्याला मथुरीच्या बाजाराला जायाचं हाय. समदी तयारी केलीस ना?"

"टाँय्ऽऽ!" रेडकानं तयारी झाल्याचं सांगितलं.

अशा रीतीनं 'गौळण' झाली. आणि सगळा तमाशा पार पडला. पण बघ्यांना काही नाच्याची उणीव कशी ती भासलीच नाही. नाना मनवेकराचा तमाशा लोकांनी अथपासून इतिपर्यंत कान देऊन ऐकला. तमाशा संपला तसे गावचे पाटील उठून उभे राहिले आणि म्हणाले—

"मस तमासे बगितलं. पण मनव्याच्या नानाचा तमास्या मातर मुलकाच्या येगळा. न्हाय फडात नाच्या. पन भादरानं एका रेडकावर नाच्याची बाजू संबळुन न्हेली. कमाल केलीस नाना. ठरल्याली सुपारीची रक्कम इनाम म्हणून आमी देऊच; पण हे चांदीचं कडं आन् ह्यो भरजरीचा शेमला बहाल केलाय तुला."

नानानं मानमानतुकीचा विडा आदबिनं घेतला आणि जमलेल्या रसिकांना मानाचा मुजरा केला. अवतीभवतीच्या दहा-पाच गावच्या माणसांनी नानाचं 'कवतिक' बघितलेलं होतं. ते आपल्या गावी जे परतले ते नानानं केलेली करामत घेऊनच. हा हा म्हणता मनव्याच्या नानाचा बोलबाला झाला. जत्रेच्या सुपाऱ्यावर सुपाऱ्या चालून यावयाला लागल्या. नाच्यापोरं असलेले फड – त्यांना कुणी सुपारी देईना. नानाची खास करामत बघण्यासाठी म्हणून गावोगावची मंडळी नानाला सुपारी देऊन बोलवू लागली. नाना गाजला. त्याचा आणि त्याच्या आगळ्या तमाशा फडाचा बोलबाला झाला. धास्तावलेल्या त्याच्या तमासगिरांना नवी उमेद आली.

नाना मनवेकराचा तमाशा बघून घरी परतणारी माणसं आपलं गाव जवळ येईपर्यंत हेच म्हणत—

"आयला, नाम्या!"

"काय रं?"

"लेका रेडकू की रं नाचावलंय मनव्याच्या नानानं. हिकमतीच हाय मोटा नाना.

"तर काय मर्दा. ह्याला म्हनावं खरा तमासगीर. हो."

◻ ◻ ◻

# भुताटकीचे घर

फार फार वर्षांपूर्वी बगदाद शहरात एक गवंडी राहात असे. हा गवंडी भला माणूस होता. मिळेल ते काम सचोटीने करावे आणि उरलेल्या वेळात अल्लाचे नाव घ्यावे असा त्याचा स्वभाव होता. पण दुर्दैवाने त्याला काम इतके कमी मिळायचे की, त्याच्या कुटुंबाचे फार हाल होत असत.

एके दिवशी रात्री, गवंडी गाढ झोपलेला असताना कोणीतरी त्याचा दरवाजा ठोठावला. गवंडी जागा झाला. पण कोणीतरी उंदराची खुडबुड चालली असेल असे वाटून त्याने आवाजाकडे दुर्लक्ष केले. मग पुन्हा आवाज आला. आता मात्र दरवाजा वाजला अशी त्याची खात्री झाली. एवढ्या रात्री कोण आले असावे याबद्दल आश्चर्य करीत गवंड्याने दरवाजा उघडला. दारात एक काझी उभा होता. तो म्हणाला, "गवंडी-दादा, अशा अपरात्री उठवून मी तुम्हाला त्रास दिला याबद्दल मला माफ करा. पण माझं कामच तसं महत्त्वाचं आहे. आणि ते करायला तुझ्यावाचून दुसरा योग्य माणूस मिळणं शक्य नाही.

"कसलं काम?" गवंड्याने विचारले.

"ते कळेलच तुला थोड्या वेळात. पण त्यासाठी मी नेतो तिकडे यायला पाहिजे तुला. आणि येताना मला डोळे बांधावे लागतील तुझे; पण कामाबद्दल पैसे मात्र भरपूर देईन मी." काझीने स्पष्टीकरण केले.

गवंड्याने संमती दिल्यावर काझीने एका रेशमी रुमालाने त्याचे डोळे बांधले. दाराशी घोडागाडी उभी होती. त्यात बसून ते दूरवर गेले. मग त्यातून उतरून, कित्येक वेड्यावाकड्या रस्त्यातून, गल्लीबोळांतून पायपीट केल्यानंतर ते एका घरापाशी आले. डोळे बांधलेले असतानाच किल्ली लावून दार उघडल्याचा झालेला आवाज गवंड्याने ऐकला. ते दोघे आत शिरले. आत गेल्यावर काझीने गवंड्याच्या डोळ्यावरचा रुमाल सोडला.

ते दोघे एका घराच्या पटांगणात उभे होते. पटांगणाच्या मध्यभागी एक कोरडे पडलेले कारंजे होते. त्या कारंज्याचा एक चिरा काझीने

हलकेच काढला. झालेल्या पोकळीत खाली जायला एक जिना होता. त्या जिन्यावरून ते दोघे खाली उतरले. त्यानंतर काझी गवंड्याला म्हणाला, "गवंडीदादा, इथं एक तळघर बांधून पाहिजे मला."

"ठीक आहे" गवंडी म्हणाला.

काझीने सगळे सामान पुरवल्यानंतर गवंड्याने काम सुरू केले. काम अर्धवट राहिले असतानाच रात्र संपत आली. तेव्हा 'उरलेलं काम उद्या कर' असे त्या काझीने गवंड्याला सांगितले. त्याचे डोळे त्याने पूर्वी-प्रमाणे बांधले आणि उजाडायच्या आधीच त्याला घरी आणून सोडले.

अशा पाच रात्री गवंड्याने काम केले. पाचव्या रात्री तळघर बांधण्याचे काम पुरे झाले. त्यानंतर काझीने जवळच्याच एका घरातून काही रांजण गवंड्याच्या मदतीने तळघरात आणून ठेवले. रांजण चांगलेच वजनदार होते; आणि त्यांतील काहींमध्ये तरी मोहोरा असाव्यात असा संशय गवंड्याला आला. एकूण काझीसाहेब संपत्ती साठवण्यासाठी या तळघराचा उपयोग करणार होते तर! त्याचा ठिकाणा कळू नये म्हणून तर हा सगळा डोळे बांधण्याचा, रात्री काम करण्याचा खटाटोप.

गवंड्याला या कामाबद्दल खरोखरच भरपूर बिदागी मिळाली. काही दिवस गवंड्याने चैन केली. नंतर पुन्हा त्याची स्थिती पूर्वीसारखीच झाली. सचोटीने काम करून उरलेल्या वेळात अल्लाचे नाव घेण्याच्या त्याच्या स्वभावात अर्थातच बदल झाला नव्हता.

अशी काही वर्षे उलटली. त्या काझीला आणि त्याच्या विक्षिप्त कामाला गवंडी विसरून देखील गेला होता. एके दिवशी तो आपल्या घराच्या दाराशी स्वस्थ बसलेला असताना एक श्रीमंत व्यापारी घोडा-गाडीतून त्याच्याकडे आला. या व्यापाऱ्याच्या मालकीची कित्येक घरे बगदाद शहरात होती.

एवढा मोठा श्रीमंत व्यापारी आपल्याकडे यावा याचे गवंड्याला आश्चर्य वाटले. त्याने व्यापाऱ्याला अदबीने अभिवादन केले. व्यापारी

म्हणाला, " मी एका कुशल गवंड्याच्या शोधात होतो. कोणीतरी तुझं नाव सांगितलं मला, म्हणून मी इथं आलो."

"काय काम आहे आपलं?" गवंड्याने विचारले.

"माझ्या मालकीचं घर मोडकळीला आलं आहे. पूर्वी त्या घरात एक काझी राहायचा. लोक म्हणतात की तो फार श्रीमंत होता. परंतु मेला तेव्हा त्याच्याकडे काही थोड्या चांदीच्या नाण्यांपलीकडे काहीही नव्हतं. आता त्या घरात कोणीच राहात नाही. कारण काझीचं भूत त्या घरात वावरतं, रात्रीबेरात्री त्या घरातून पैसे मोजण्याचा आवाज येतो, अशा वदंता लोकात पसरल्या आहेत. हे घर दुरुस्त करायचा माझा विचार आहे. ते प्रत्यक्ष पाहून दुरुस्तीला किती खर्च येईल ते तू सांगशील का?"

गवंड्याने होकार दिला. मग त्या श्रीमंत व्यापाऱ्याच्या घोडागाडीत बसून पुष्कळ वेळाने ते एका मोडकळीला आलेल्या घरापाशी आले. घर अर्धेअधिक कोसळलेलेच होते, आणि पटांगणात एक कोरडे पडलेले कारंजे होते!

कारंजे पाहिल्याबरोबर, कित्येक वर्षांपूर्वी, एका काझीच्या सांगण्यावरून अपरात्री केलेल्या कामाचे स्मरण गवंड्याला झाले. त्याच्या डोळ्यांना एकदम ते संपत्तीने भरलेले रांजण दिसू लागले. त्यांचा ठावठिकाणा त्याला अचूक ठाऊक होता.

तो व्यापाऱ्याला म्हणाला, " महाशय, आपण परवानगी देत असाल तर मी काही दिवस या घरात राहतो, आणि ते झकास दुरुस्त करतो. शिवाय मला थोडी मांत्रिकी देखील येते. तेव्हा त्या काझीच्या भुताचादेखील बंदोबस्त करून टाकतो."

व्यापाऱ्याला आनंद झाला. गवंडी त्या घरात दुरुस्ती कामासाठी राहू लागला.

गवंड्याने आपले शब्द खरे केले. त्या घरातून रात्रीबेरात्री नाणी मोजल्याचा आवाज आता ऐकू येईनासा झाला. कारण ती नाणी आता गवंड्याच्या खिशात खुळखुळत होती!

[ आधारित ]

# आयुर्विम्यातील तुमच्या बचतीने पुसद शहराला मुबलक पाणी मिळवून दिले





पुसद हे २०-२२ हजार लोकवस्तीचं एक छोटं शहर ! लोकांच्या सुखसोयींसाठी झटणाऱ्या नगरपालिकेपुढे पाणी पुरवठ्याची समस्या होती. दूरवर जाऊन पाणी आणावे लागे.

परंतु आता शहरात नळ आल्याने मुबलक पाणी मिळू लागले आहे.

पाणी पुरवठ्याच्या या योजनेखाली आयुर्विमा कॉर्पोरेशनने नगरपालिकेला कर्जरूपाने मदत केली.

तुमच्या हप्त्यांच्या रकमेतूनच अशा कल्याणकारी योजनांना आयुर्विमा कॉर्पोरेशन हातभार लावते. अशा तऱ्हेने आयुर्विम्यातील तुमचा पैसा देश उभारणींच्या कार्यात महत्वपूर्ण कामगिरी बजावतोच; शिवाय तुमची जोखीम बाळगण्याचेही कार्य करीत असतो.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**



# भिंतीच्या तुंबड्या

## एक नवीन ट्रॅन्क्विलायझर : बायको

जनमताचा कानोसा नावाची एक फॅशनेबल चीज आहे, तिचा उपयोग कोणत्या गोष्टीसाठी करावा याला काही धरबंद उरलेला दिसत नाही. दिल्लीला नुकतीच एक समाजशास्त्रीय परिषद झाली. तिच्यात एका उपद्व्यापी पंडिताने ब्रह्मचाऱ्यांना ब्रह्मचर्याबद्दल काय वाटते याची मतमोजणी करून त्यावर एक विद्वत्ताप्राचुर प्रबंध पेश केला. आता काय म्हणावे या माणसाच्या अव्यापारेषु व्यापाराला ? या पाहणीत म्हणे त्याला आढळून आले की, पाऊणशे टक्के ब्रह्मचारी बायकोच्या शोधात असतात, पस्तीस टक्के ब्रह्मचाऱ्यांच्या मते बायको हे एक 'ट्रॅन्क्विलायझर' आहे, अन् फक्त चार टक्के ब्रह्मचाऱ्यांना लग्न करणे चांगले की वाईट हे सांगता आले नाही, म्हणजे आता आहे की नाही ? कालिदासाने बायकोचे वर्णन 'गृहिणी सचिवः सखी मिथः' असे काही तरी भरमसाट करून ठेवल्यापासून ब्रह्मचाऱ्यांच्या बायकोबद्दलच्या गोड गैरसमजुती आजतागायत कायम आहेत असे दिसते.

बा ब्रह्मचाऱ्या, सगळे जग सुखाच्या शोधात असताना तू मात्र बायकोच्या शोधात असावेस ना ? पण थांब, बायको ही एक फार कठीण परीक्षा आहे, अन् या परीक्षेचा पेपर नीट सोडवता आला तरच या फंदात पड. आता हे खरे आहे की, विद्यार्थ्याला परीक्षकाचा धाक नसेल एवढा बायकोचा नवऱ्याला असतो. त्यामुळे कोठलाही नवरा राजीखुषीने व अक्कलहुशारीने स्वतः दिलेल्या परीक्षेचा पेपर दाखवील हे संभवत नाही. पण आहे या नेभळट जमातीतही एक निधड्या छातीचा वीर आहे. मी ! हा घे मी पेपर फोडतो. (— संपादक, हा अंक तेवढा आमच्याकडे पाठवू नका बरे का, बजावून ठेवतो. नाही, म्हणजे तसा काही मी कोणाला डरत नाही हो, पण आपले डिस्क्रीशन इज द बेटर पर्ट ऑफ् मॅरीड व्हेलर, काय समजलात ? बाकी तुम्हाला त्याचा अनुभव असेलच म्हणा ! )

गृहविज्ञान : गृह कशाला म्हणतात ? चाळीच्या दीडखणी खोलीत संसार थाटल्यावर बायको मैत्रिणीला, "आमच्या ब्लॉकवर केव्हा येणार ?" असे मुद्दाम

विचारते तेव्हा तुम्ही चुकीची दुरुस्ती करण्याची चूक करता का ?

गणित : " अहो, काल किनई शेजारच्या शकूने कित्ती सुंदर फुलवायल घेतलेय्, अन् किमत फक्त पस्तीस रुपये !" अशी धोक्याची सूचना मिळाल्याबरोबर तुम्ही फुलवायल एके फुलवायल, फुलवायल दुणे नायलॉन जॉर्जेट असा तोंडी हिशेब लावू शकता का ?

आहारशास्त्र : खारट, आंबट किंवा तिखट स्वयंपाक गोड मानून घेण्याइतकी तुमची जीभ कंडम झाली आहे का ?

तर्कशास्त्र : " आज संध्याकाळी किनई मी तुमच्यासाठी छानसा शिरा करणार आहे. " या वाक्याचा अर्थ ' रात्री घरी जेवण नाही, आज पिक्चरला जायचं अन् तिथून चिकन–तंदूरीचा प्रोग्राम " हे समजण्याइतके प्राथमिक तर्कशास्त्र तुम्हाला येते का ?

अर्थशास्त्र : "अहो, मी गेले होते ब्लाऊजचं कापड आणायला पांच रुपये बारा-पर्यंत, पण साड्यांचा सेल पाहिला अन् पंचवीस रुपयाची साडी अवघी वीस रुपयात घेतली, म्हणजे पाच रुपये खर्चायच्या ऐवजी पांच रुपये वाचवले की नाही ?" या व्यवहारातले अर्थशास्त्र तुम्हाला कळते का ?

जाऊ दे, आणखी प्रश्न सांगत नाही. कारण एक तर लग्न करणे म्हणजे तेथे पाहिजे येरे गबाळे, जातीच्या ब्रह्मचाऱ्याचे काम नोहे; अन् दुसरे म्हणजे संपादकांच्या प्राणघातक विसरभोळेपणामुळे हा अंक आमच्याकडे येऊन आमच्या हिच्या हातात पडला तर काय घ्या ?

## बैलांचे शिष्टमंडळ

आपल्या देशातली माणसे म्हणजे निव्वळ बैल आहेत असे काही मंडळींचे अनुदार मत आहे; पण आमच्याकडची माणसे बैलाइतकी कुचकामी असतील तर आमच्याकडचे बैल माणसाइतके कुचकामी आहेत असे दिसते. कारण परवाच वर्तमानपत्रात वाचले की, आपल्या गुरांची पैदास सुधारण्यासाठी शंभर अमेरिकन बैल न्यूयॉर्कहून विमानाने मुंबईला आले. आता बोला ! आपल्याकडची माणसे बैलगाडीतून प्रवास करतात, तर अमेरिकेतले बैल विमानाने प्रवास करतात. अन् तेही बरोबरच आहे म्हणा ! हिंदुस्थानातले दोन बैल नुकतेच एकमेकांशी भांडल्यापासून येथल्या बैल जमातीला व पर्यायाने माणसांना अक्कल शिकविण्यासाठी येणारे हे अमेरिकन तज्ज्ञ बैलांचे शिष्टमंडळ सरकारी पाहुण्याच्या इतमामानेच यायला हवे. मी पंतप्रधान असतो तर या सन्माननीय धेनुवल्लभांना प्रोटोकॉल–पूर्वक रिसीव्ह करण्यासाठी प्रत्यक्ष नंदी बैलालाच एअरपोर्टवर पाठविला असता.

**– सुधाकर राजे**

केवळ शब्दांची आतषबाजी

# तुझा तू वाढवी राजा

'तुझा तू वाढवी राजा' हे वसंत कानेटकरांचे नवीन नाटक. रंगभूमीवर आणले गोवा हिन्दू अॅसोसिएशन या संस्थेने. दिग्दर्शक मा. दत्ताराम. नाट्यविषय, नाटककार, नाट्यसंस्था आणि दिग्दर्शक अशी ही चौकट रायगडनंतर पुन्हा एकदा जमून आली. तथापि रायगडला जे जमून गेले ते या वेळी मात्र जमले नाही.

तुझा तू वाढवी राजा, या नाटकातील शहाजी, शिवाजी, आणि जिजाबाई या तीन ठळक व्यक्तिरेखा, परंतु नाटक जसे आकार घेऊ लागते तसतसे शहाजी आणि शिवाजी बाजूला पडून नाटक संपूर्णपणे जिजाबाईच्या हातात जाते. नाटकामध्ये घडणाऱ्या घटना अतिशय मामुली स्वरूपाच्या असल्याने जिजाबाई – शहाजी, जिजाबाई – शिवाजी, जिजाबाई आणि सून सईबाई यांच्या भोवती नाटक फिरत राहाते. संघर्षात्मक नाट्य घडत नसल्यामुळे आणि सांगण्यासारखेही विशेष काही नसल्याने संपूर्ण प्रयोग उगाचच रवथ चालल्यासारखा चालत रहातो. शहाजी आणि जिजाबाईचे बिनसते, आणि जिजाबाई छोट्या शिवाजीला घेऊन पुण्यास येते. हिंदवी स्वराज्याचा अंकुर बालशिवाजीच्या मनात फुलवत असतानाच त्याच्या पित्याची–शहाजीची एक सुस्पष्ट प्रतिमा तिने बालशिवाजीसाठी घडवलेली असते या प्रतिमेला तडा जाऊ नये म्हणून अतिशय दक्षता घेणारी जिजाऊ प्रत्यक्ष पती, लाही या गोष्टीची कल्पना देते. आणि त्याप्रमाणे शहाजीराजांनी शिवाजीशी वागावे- असा आदेश ती आपल्या पतीला देते.

शहाजीच्या पूर्वायुष्यातील काही घटना, शिवाजीच्या कार्यव्यापामुळे शहाजीला. झालेली अटक आणि मोगल दरबाराशी संगनमत करून शिवाजीने केलेली शहाजीची सुटका, या प्रत्यक्ष न घडता निवेदनरूपाने प्रेक्षकांपर्यंत पोचवलेल्या अन्य घटना, या बाबींची दखल नाटक घेते.

या नाटकाला ऐतिहासिक का म्हणावे हे खरोखरच समजू शकत नाही. ऐतिहासिक वास्तवतेशी नाटककार प्रामाणिक नाहीत. कित्येक महत्त्वपूर्ण घटना त्यांच्या कल्पनाशक्तीतून निर्माण झाल्या आहेत. शहाजीराजे शिवाजीला वाघनखे देतात आणि जिवावर बेतेल तेव्हाच त्याचा वापर करा असा आदेश देतात. या प्रसंगाला ऐतिहासिक सत्यतेचा कितपत दुजोरा आहे ? अर्थात ऐतिहासिक नाटकाकडून शंभर टक्के सत्याची अपेक्षा कोणीच करत नाही. आणि तशी करणे योग्यही नव्हे. तथापि जवळजवळ संपूर्ण नाटक प्रस्थापित इतिहासापासून दूर नेऊनही त्याला ऐतिहासिक नाटक म्हणावे, असाच प्रकार या नाटकाच्या बाबतीत झाला आहे.

नाटकासाठी जी भाषा कानेटकरांनी वापरली आहे, त्यामध्ये स्थलाकाळाचा तोल संभाळला असला तरी त्यातून व्यक्त होणाऱ्या आशयाला या मर्यादा नाहीत. पिता–पुत्र, पती–पत्नी यांच्यामधील हे संघर्ष नाटकातील पात्रापुरतेच म्हणजे शहाजी–शिवाजी, आणि शहाजी–जिजाऊ यांच्या पुरतेच मर्यादीत रहात नाहीत. आता हे नाटककाराचे यश समजावयाचे, का अपयश याबाबतीत मतभेद होऊ शकतील, आणि या मतभेदाच्या आधारावरच नाटकाच्या मूल्यमापनातही तफावत पडेल.

नाटकासंबंधी सर्वात महत्त्वाची तक्रार म्हणजे नाटकात काहीच घडत नाही. केवळ शब्दांच्या आतषबाजीवर, नेपथ्याच्या सजावटीवर, आणि कलाकारांच्या कौशल्यावर प्रेक्षकांना तीन–चार तास खुर्चीत खिळवून ठेवता येत नाही. पैसे आधीच दिले असल्याने प्रेक्षक बसून रहातो आणि प्रयोग संपल्यावर लक्षात राहतात–एक दोन कलावंत आणि नेपथ्यातील वैशिष्टचे.

लिखाणाच्या दृष्टीने समाधान न देणाऱ्या या नाटकाचा प्रयोग मा. दत्താराम यांनी धोपटमार्गी पद्धतीने बसवला आहे. त्यांच्यासह सर्व कलाकारांचा कृत्रिम अभिनय अतिशय त्रासदायक वाटतो. प्रयोग पहाण्यापूर्वी नाटकाच्या नेपथ्यासंबंधी बरेच ऐकले होते. तथापि ही बाजूही पूर्ण समाधान देऊ शकली नाही. फ्लॅश बॅकस्‌चे संयोजनही फारसे समाधानकारक नव्हते. कलाकारांमध्ये सर्वात जास्त वाव उषा सरपोतदार (जिजाबाई) यांना आहे. आलेली ही संधी त्यांनी पुष्कळ प्रमाणात साधली आहे. जिजाऊचा भारदस्तपणा त्यांच्या वागण्या-बोलण्यात जाणवतो. शहाजी बरोबरचे त्यांचे प्रवेश त्यांनी आपल्या कौशल्याने यशस्वी केले आहेत. पतीच्या अटकेनंतर निर्माण झालेली मनोव्यथाही त्यांनी यथार्थपणे व्यक्त केली आहे.

दिग्दर्शक मा. दत्ताराम यांनी शहाजीची भूमिका त्यांच्या नेहमीच्या लकबीने–केली आहे. अभिनेता अथवा दिग्दर्शक म्हणून त्यांचा प्रभाव पडल्याचे जाणवत नाही. राजस साठे हा पुण्याचा नवीन कलावंत शिवाजीच्या भूकिकेत शोभून दिसतो. अत्यंत प्रामाणिकपणे, आणि भरपूर मेहनत घेऊन केलेली भूमिका एवढेच मर्यादित वर्णन त्याच्या भूमिकेचे करावे लागेल.

गोवा हिन्दू अॅसोसिएशन या संस्थेने या नाटकाच्या यशस्वी निर्मितीसाठी भरपूर प्रयत्न घेतल्याचे दिसून येते. कलाकारांची निवड करतानाही पुरेसा चोखंदळपणा दाखवला आहे हे मान्य करावे लागेल. कलाकारांपैकी भारती वर्मा काहीशा वेगळ्या वाटतात. दत्तारामबापूंच्या दिग्दर्शनाची छाप ज्यांच्यावर पूर्णत्वाने पडलेली नाही अशा त्या या नाटकातील एकमेव कलावंत.

वसंत कानेटकर हे सध्याचे ' बिनीचे ' नाटककार. सध्या लोकप्रियतेच्या लाटेवर तरंगणाऱ्या या नाटककाराचे हे नाटक कदाचित् आर्थिक दृष्टया यशस्वी होईलही. तथापि नाटककार म्हणून त्यांच्याकडून ज्या अपेक्षा आहेत त्या अपेक्षा हे नाटक पूर्ण करू शकत नाही हे नमूद करावेच लागेल.

–शरद गोखले

[ पृष्ठ २ वरून ]

आल्यामुळे आधीच असंतुष्ट झालेल्या आत्म्यांना हा आणखी एक धक्का होता. चक्रावून जाऊन ते म्हणाले, " काँग्रेसच्या कार्यकारिणीत संस्थानिक ! हा तर अर्वाच्यपणा ! "

झाले, सुब्रह्मण्यम् यांचे धाबे दणाणले. विशेषत: तरुण तुर्कांच्या करूण किकाळयांनी तर ते चांगलेच हादरले व त्यांनी असा गर्भगळीत खुलासा केला की, ही नवीन कार्यकारिणी काही कायमची नाही, जानेवारीत कायम अध्यक्षांची निवडणूक होईल तोपर्यंतच टिकणार आहे. (–खरे म्हणजे ही कार्यकारिणी लगेच महिन्याभरात बदलायची नाही, वर्षभर ठेवायची असा आधी बेत होता.) त्यांनी असाही निर्वाळा दिला की, ही मंडळी कार्यकारिणीत घेण्याच्या बाबतीत आपण प्रधानमंत्राणी किंवा गृहमंत्री यांचा सल्ला घेतलेला नाही. " ही चूक असेल तर ती माझी एकट्याची आहे, व माझ्यानंतर अध्यक्षपदावर येणाऱ्याने तिच्यापासून धडा घ्यावा. "

चूक ? त्या तिघांनी एकदम भडकून विचारले, " आम्हाला घेतलें ही चूक ? मग हे घ्या आमचे राजीनामे. " तिघांनीही घुश्शात राजिनामे दिले. आता आली का पुन: पंचाईत ? त्या तिघांची समजूत घालण्यासाठी धावपळ सुरू झाली व सुब्रह्मण्यम् म्हणाले, " या मित्र-मंडळींना राजिनामा द्यायचा अधिकार आहे तर मला तो न स्वीकारण्याचा अधिकार आहे. " आहे की नाही गंमत ? त्यागपत्रात या तिघांनी ' राजे व कंत्राटदार ' लोक नवीन काँग्रेसच्या ' प्रागतिक ' प्रयत्नांना अडसर घालू पाहत आहेत, पण आपण त्यांचा निर्धाराने सामना करू, अशी जाहिरात केली आहे. नंदिनीबाईंनी आपल्या पत्रात अशी रणगर्जनाही केली आहे की, " काही मंडळींनी आमची निंदा-नालस्ती चालवली आहे, पण आपण त्याला बधणार नाही. " साम्यवादी पक्षाचे सभासदत्व अन् साम्यवादी वकिलातींशी छुपे संगनमत हे तर आपल्यावर निव्वळ कुभांड आहे. असा या मंडळींनी व त्यांच्या तीने अध्यक्ष सुब्रह्मण्यम् यांनीही निर्वाळा दिला आहे.

## इंदिरा-काँग्रेसने ' राम ' म्हटला !

सुब्रह्मण्यम् यांना या सर्व भानगडी निस्तरणे दुरापास्त झाले असले तरी त्यांची लवकरच सुटका होणार आहे. कारण जगजीवनराम इंदिरा-काँग्रेसचे स्थायी अध्यक्ष होणार असे ठरले आहे. गेल्या आठवड्यात या पदासाठी प्रत्यक्ष इंदिराजीपासून भगवत झा आझादसारख्या आलतू फालतू मंडळींपर्यंत अनेक नावांची चर्चा झाली व अखेर ही घोरपड जगजीवनरामांच्या गळ्यात अडकविण्यात आली. या निवडीवर

ज्या विविध प्रतिक्रिया दिसल्या त्यातली विरोधी पक्षाची पहिली प्रतिक्रिया म्हणजे टॅक्स-प्रकरणात पाय अडकलेल्या जगजीवनरामांना उजळ माथ्याने मंत्रिमंडळ सोडता यावे म्हणून इंदिराजींनी हा गजेंद्रमोक्ष केला. अर्थात् इंदिरा-गोटाने तसे काही नसल्याचा निर्वाळा दिला आहे हे सुज्ञांस सांगणे न लगे. दुसरी प्रतिक्रिया अधिक महत्त्वाची आहे. मध्यावधी निवडणुकी घेण्याचा आमचा विचार नाही अशी ग्वाही इंदिरा-सरकार पुन: पुन: देत असले तरी तसे काही तरी घडणार अशा अफवांनी राजधानीतले वातावरण आधीच कुंद जाले आहे. त्या अफवांना आता अधिकच चेव आला आहे. कारण अशी निवडणूक झाली तर ती आपल्या भवितव्याच्या दृष्टीने निर्णायक ठरेल याची इंदिराजींना कल्पना आहे; तेव्हा काही निरीक्षकांच्या मते निवडणुकीच्या दृष्टीने पक्षाची जय्यत तयारी करण्याची आवश्यकता भासल्याखेरीज बाईंनी आपला सरकारी उजवा हात असा कलम केला नसता. बाई सध्या मध्यवधी निवडणुकीला सारख्या नको नको म्हणत आहेत खऱ्या, पण स्त्रीचा नकार हा होकार असतो म्हणे !

## इंदिराजींचे पारितोषिक वितरण केव्हा ?

असो. जगजीवनरामानंतर तर आता मंत्रिमंडळात इतक्या जागा खाली आहेत की, बऱ्याच मोठ्या प्रमाणावर नवीन रंगरूट-भरती व खात्याची खांदे पालट होणं आता अपरिहार्य दिसते. पण इंदिराजींचे हे पारितोषिक वितरण नक्की केव्हा होईल हे सांगणे सध्या तरी कठीण आहे. बऱ्याच मडळींच्या मते सध्याचे पार्लमेंटचे अधिवेशन संपेपर्यंत इंदिराजी काही करणार नाहीत. कारण त्यांना येऊन मिळालेल्या मंडळींपैकी बरेच जण बक्षिस-समारंभाची वाट पाहत आहेत हे लपलेले नाही. अर्थात् त्यातल्या काही मंडळींची निराशा होणे अपरिहार्य आहे, तेव्हा ही निराशा सध्या इंदिराजींना टाळायची आहे. एकदा मुंबईचा सोहळा आटोपला की, मग इंदिराजी काय ती भरती करतील असा होरा आहे. आता कोणाला काय बक्षीस मिळणार यांबद्दल सध्या राजधानीत ज्या वावड्या उडत आहेत, त्यातली एक खमंग वावडी म्हणजे यशवंतरावांना उपप्रधानमंत्र्याचे पद बहाल करण्यात येईल. पण इतर काही मंडळींच्या मते ही जागा यापुढे काढूनच टाकण्यात येईल, मात्र यशवंतरावांना मंत्रिमंडळांत दुसरा क्रमांक मिळेल. काँग्रेस-अध्यक्ष म्हणून जगजीवनरामांनी सुब्रह्मण्यम् यांची जागा घेतल्यावर सुब्रह्मण्यम् हे जगजीवनरामांची अन्नान्नमंत्र्याची जागा घेतील असाही अंदाज आहे.

## पक्षनिष्ठेचा व्यापार

इंदिरा-कॉंग्रेसमध्ये हे सर्व चालू असताना अप्पा-कॉंग्रेसचे खुले अधिवेशन अहमदाबादेस २१-२२ डिसेंबरला भरण्याचे नक्की झाले आहे. हा निर्णय घेताना असा

अंदाज बांधण्यात आला आहे की, या अधिवेशनाला काँग्रेसच्या एकूण ७०५ मताधिकारी ए. आय्. सी. सी. सदस्यांपैकी सुमारे ३०० व ४८०० प्रतिनिधींपैकी सुमारे २५०० उपस्थित राहतील. निर्णय घेणाऱ्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना अप्पा म्हणाले, "बहुसंख्य प्रतिनिधी आमच्या बाजूचे आहेत, तेव्हा ते अहमदाबादला येतील." पण गंमत म्हणजे अव्यभिचारिणी निष्ठा नावाची चीज सर्वसाधारण काँग्रेसमनला माहीत नसते हे दोन्ही काँग्रेसचे नेते ओळखून आहेत. उदाहरणार्थ काही ए. आय्. सी. सी. सदस्य मुंबईच्या अधिवेशनालाही जातील व अहमदाबादच्या अधिवेशनालाही जातील याची श्रेष्ठींना कल्पना आहे. इतकेच नव्हे तर दिल्लीच्या अधिवेशनाला आलेल्या ए. आय्. सी. सी. सदस्यांपैकी किमान १०० तरी अहमदाबादला येतील असा आशावाद अप्पा.गोटात व्यक्त करण्यात येत आहे.

## काँग्रेस विरुद्ध काँग्रेस

पक्षातल्या या सर्व सुंदोपसुंदीचे प्रतिबिंब पार्लमेंटमध्ये अर्थातच पडले आहे. रबात प्रकरणी इंदिराजींना नव्या विरोधी पक्षाच्या बरोबर इतक्या काँग्रेसवाल्यांनीही पाठिंबा दिला की, त्यांना विरोधी पक्षाची कुबडी न घेताच सरकार चालविता येईल, असे मत काही जबाबदार वृत्तपत्रांनी प्रकट केले होते. पण 'ते हि नो दिवसा गता:' हे स्वत: बाईंनी मात्र ओळखले आहे; कारण रुसलेल्या खाडिलकरांना मंत्रिपदाचा खाऊ दिल्यापासून लोकसभेचे उपाध्यक्षपद भरण्याचा प्रश्न उपस्थित झाला. तो सोडविण्यासाठी त्यांनी ते पद द्रविड मुन्नेत्र कळहमला देऊ केले. पण करुणानिधींचा मासा गळाला लागला नाही. उलट विरोधी काँग्रेसने तेच पद कळहम्‌ला देऊ केले असून सर्व विरोधी पक्षाचा या ऑफरला पाठिंबा आहे. काही झाले तरी सरकारी उमेदवाराला प्रतिस्पर्धी उभा करायचा असे ठरले आहे, आणि विशेष म्हणजे असा एकजुटीचा विरोध करण्याच्या कामी विरोधी काँग्रेसनेच हिरीरीने पुढाकार घेतला आहे.

— अनामिक

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-649

लाल महाल

प्रतापगड

पन्हाळगड

राजगड

पुरंदर

आग्रा

आवृत्ती : तिसरी

किंमत : तीन रुपये

ब. मो. पुरंदरे

यांची सहा पुस्तके

१५ डिसेंबरला

प्रसिद्ध होत आहेत.

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव
पुणे ३०